मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

परस्परं भावयन्तः

म प्र

**अंक ८५ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ मार्च, २०११**

**वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in**

(फक्त खाजगी वितरणासाठी)



## संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार

२०११ सालातील हितगुजचा हा पहिला अंक

दिनांक २६ जानेवारीला पुणे शाखेचा वर्धापनदिन संपन्न झाला तेव्हा आपली भेट झाली. 'हितगुज'च्या माध्यमातून सांस्कृतिक समृद्धी वाढविण्याचा प्रयत्न मराठे परिवार करीत आहे. आर्थिक समृद्धी इतकीच सांस्कृतिक समृद्धीचीही समाजाला आवश्यकता असतो. शेअर्स बाजार, दलाल स्ट्रीटवरचे चढ-उतार, दूरदर्शनवरची रंगीबेरंगी मौज-मस्ती, धमाल धमाका यांच्या पलीकडच्या विश्वात साहित्य आपल्याला घेऊन जातं. टीव्हीवर काल काय पाहिलं ते आज आठवणार नाही, पण वीस वर्षांपूर्वी

*पुढील पानावर*



**विज्ञानप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना आपले कुलबांधव प्रो. प्रमोद मराठे**

दिनांक ८,९,१० डिसेंबरला ई/फ, दक्षिण वॉर्ड माध्यमिक आणि उच्छ माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये २०१०-२०११ विज्ञान प्रदर्शन, सेंट अन्थोनीज या विज्ञान प्रदर्शनाचे प्रमुख पाहुणे आपले कुलबांधव प्रा. प्रमोद मराठे, ठाणे (पृ.३७६) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. प्रा. प्रमोद कृष्ण मराठे हे होमी भाभा उपसंशोधन केंद्रातील भूतपूर्व वैज्ञानिक अधिकारपदावर कार्यरत होते.

जीवनातील आव्हांनासाठी विज्ञान व तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरते हा प्रदर्शनाच्या मुख्य हेतू होता. जैवविविधता संरक्षण व संपोषण, कृषी आणि तंत्रज्ञान, हरितऊर्जा, वाहतूक व दळणवळण, सामाजिक आरोग्य व पर्यावरण, गणितीय प्रतिरूपणे इ. उपविषयांवर प्रदर्शनात भर दिला होता. दिनांक १४ डिसेंबरला विभागीय प्रदर्शनात श्री. प्रमोद कृष्ण मराठे यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे प्रयोग (प्रोजेक्ट) बद्दल आनुषंगिक सुधारणा सांगितल्या. या प्रदर्शनाला विद्यार्थी, पालकवर्ग, शिक्षक व म्यनिसिपल शिक्षण विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

◉ **संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१** ◉

**दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com**

◆ **अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२** ◆



**वेगेवेगे धावू नी पहिला नंबर पटकावू, कु.तेजश्री मराठे पाऊल पडते पुढे**
**धावपटू तेजश्री मराठे (पृ.५०३) मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!**

वाचलेलं आजही आठवतं. कारण संस्कार करण्याची लिखित शब्दांची क्षमता अजूनही अतुलनीय आहे आणि पुढेही राहणार आहे. साहित्य माणसाला अंतर्मुख करतं, त्याचबरोबर त्याची संवादाची भूकही भागवतं, जाणिवेच्या कक्षा रुंदावतात, अस्वस्थ करतं, उल्हासितही करतं, परस्परविरोधी परिणामांतून ते त्याच्या भावविश्वाला व्यामिश्रता देतं तर अनुभवविश्वाला अर्थपूर्णता देत असतं, मनावर व समाजावर, कुटुंबावर यातून कळत-नकळत संस्कार होत असतात. आणि या सगळ्यातून सांस्कृतिक समृद्धी साधली जात असते. आणि मला वाटतं आपलं 'हितगुज' हे सांस्कृतिक समृद्धी साधण्याचंच काम करीत आहे. अशा या अंकात 'झाकलं माणिक:श्रीमती राधा ठाकूर यांची यशोगाथा', पुणे शाखेच्या वर्धापनदिनाचे वृत्त, संगीत प्रसारक मराठे, गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्यपद समर्थपणे सांभाळणारे धुंडिराज गोविंद मराठे यांची परंपरा पुढे नेणारे संगीत गायक, वादक मराठे. हा विस्तृत लेख वाचून संगीत प्रांतातही मराठ्यांनी कसा पराक्रम केला, संगीत क्षेत्र कसे गाजविले हे पाहून सानंद अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. श्री. मोहनराव मराठे यांचे 'सुंदर कुर्ग भेट' हे प्रवास वर्णन, श्री. वि. म. मराठे यांची 'वन्समोअर' कथा, श्री. रत्नाकर सुंदर मराठे यांना 'प्रज्ञावंत पुरस्कार' मिळाला, सत्काराला त्यांनी दिलेले उत्तर. परिवारातल्या मानसन्मानाच्या, शोकसंवेदनांच्या, विवाहांच्या नोंदी इ.अनेक वाचनीय साहित्याचा समावेश 'हितगुज'मध्ये आहे. तसेच मराठे प्रतिष्ठानचे भीष्म पितामह श्री. भाऊसाहेब मराठे यांच्या धर्मपत्नी सौ. मालतीबाईंचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहणारा वि. के. मराठे यांचा भावपूर्ण लेख आणि श्रीनिवास मराठे यांचा 'कुलवृत्तांत : बदलते संदर्भ' हे लेख महत्त्वाचे आहेत.

'हितगुज'साठी विज्ञापने, देणग्या देऊन 'हितगुज' अधिक बळकट करावा ही नम्र विनंती.

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**
८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
**१८ फेब्रुवारी, २०११**

# मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३१वा वर्धापनदिन

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३१वा वर्धापनदिन दिनांक २६ जानेवारी २०११ला वेदशास्त्रोतेजक्त हॉल, मध्ये सायंकाळी साडेचार वाजता उत्साहात साजरा झाला.

सौ. वर्षा नंदलाल गोडबोले पूर्वाश्रमीच्या प्रभावती धुंडिराज मराठे यांच्या गणेशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

उद्योगरत्न श्री. अरविंद वासुदेव मराठे यांना स्मृतिचिन्ह, शाल, नारळ, गुलाबरोप देऊन श्री. सी. गो. खांबेटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

संगीत चुडामणी डॉ. श्री. सुधाकर जनार्दन मराठे यांना शाल, नारळ व गुलाबरोप देऊन श्री. अरुणराव मराठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. विजय विष्णू मराठे यांनी डॉ. सुधाकर देशपांडे यांचा परिचय करून दिला. तर सौ. निर्मला मराठे यांनी श्री. अरविंद वासुदेव मराठे तसेच सौ. वर्षा गोडबोले यांचा थोडक्यात परिचय करून दिला. (याच अंकात पृ.२१ वर आहे.)

दोन्ही सत्कारमूर्तींनी सत्काराला उत्तर देताना आपले मनोगत मोकळेपणाने मांडले.

गेल्या वर्षीच दिनांक २६ जानेवारी २०१० ला उद्योगरत्न श्री. अरविंदराव मराठे यांचा सत्कार करण्याचे ठरविले होते पण काही अपरिहार्य कारणामुळे ते राहून गेले या विषयीची दिलगिरी व्यक्त केली गेली.

सौ. वर्षा गोडबोले आणि कु. मधुरा मराठे यांचा सुगम संगतीचा कार्यक्रम अतिशय श्रवणीय झाला. ओंकारा गजवदना विनायका, पंचतुंड डमरू धर पार्वतीस आधी नमितो, ललना देवता जगाची, सोऽहम् डमरू बाजे, आज कुणीतरी यावे, घननीळा लडिवाळा, सांग तू माझा होशील का, सारेगमप, भय इथले संपत नाही, मी राधिका, हृदयी प्रीत जागते जाणता-अजाणता, हे सुरांनो चंद्र व्हा, अवघा रंग एक झाला या सारख्या सुमधुर छान गाण्यांनी रसिकांची वाहव्वा मिळविली. तबल्यावर श्री. प्रणव जोशी आणि पेटीवर सौ. पूनम सोमण यांनी चांगली साथ केली. सरगमतर्फे गायक, वादकांचा सत्कार श्रीमती सुशीला चिंतामण मराठे यांच्या हस्ते करण्यात आला.

श्री. प्रसाद घारपुरे यांचे शिवकालिन ऐतिहासिक कथाकथन प्रभावशाली झाले. त्यांचा श्री. प्रमोदन मराठे यांच्या हस्ते पाकिट, नारळ, रोप देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र चित्तपावन संघाचे श्री. अशोक वझे यांनी आपले विचार मांडले. श्री. वा. ग. मराठे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे यांनी 'हितगुज'चे महत्त्व विशद केले.

नटवर्य श्री. प्रभाकर पणशीकर, भारतरत्न श्री. भीमसेन जोशी, कै. विष्णु रामचंद्र मराठे, कै. सौ. प्रमिला लक्ष्मण मराठे, श्रीमती निर्मला रामचंद्र मराठे, कै. सुधाकर बळवंत मराठे, ठाणे, कै. श्री. दामोदर हरि मराठे,वडाळा या दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमाला आपल्या नात्यातील व परिचयातील मराठे कुलबांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गरम बटाटेवडा, नारळाची वडी आणि चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सत्कारमूर्ती संगीत चुडामणी डॉ. श्री. सुधाकर जनार्दन मराठे व श्री. अरविंद वासुदेव मराठे यांचा अल्पपरिचय खालीलप्रमाणे

**१. संगीत चुडामणी डॉ. सुधाकर जनार्दन मराठे** यांचे हिंदुस्थानी संगीतात डॉक्टरेट मिळविली आहे. त्यांचे संगीताचे शिक्षण बालवयापासूनच त्यांचे वडील श्री. जनार्दन मराठे यांचे मार्गदर्शनाखाली सुरू झाले. त्यांचे गायनाचे अनेक कार्यक्रम देशभर झाले.

ख्यातनाम गायक पंडित चर्तुभुज राठोड व उस्ताद गुलाम ख्वाजा यांच्या बरोबर जुगलबंदीचेही कार्यक्रम झालेले आहेत. त्यांच्या गाण्याच्या मैफिलीत त्यांना पंडित अप्पा जळगावकर यांनी हार्मोनियमवर साथ केली आहे तसेच पंडित सुरेश तळवलकर यांची तबल्याचीही साथ त्यांना मिळाली आहे. पुणे आकाशवाणी केंद्रावर बी ग्रेड आर्टिस्ट म्हणून त्यांचे गायनाचे कार्यक्रम झाले आहेत. संगीतातल्या प्रदिर्घ अनुभवांनंतर त्यांनी विद्यार्थ्यांना संगीत शिकविण्यासही सुरुवात केली. त्यांच्या शिष्योत्तमात पंडित उपेंद्र भट, संगीत दिग्दर्शक विश्वनाथ मोरे, श्रवण राठोड व हिंदीतले प्रसिद्ध संगीतकार नदीम-श्रवण यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचा मुलगा श्री. धनंजय मराठे गेली २३ वर्षे त्यांच्याकडे गाणे शिकत आहेत.

**२. श्री. अरविंद वासुदेव मराठे :** शिक्षण : बी.ई. इलेक्ट्रिकल, बी.ई. मेकॅनिकल. सर्वप्रथम धारवाड येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये लेक्चररची नोकरी केली. १९६९ मध्ये चिंचवड येथे स्वत:चा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला रस्टन कंपनीमधील जॉब केले. त्यानंतर थर्मेक्स कंपनीमध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लँटसाठी लागणारे सर्व जॉबवर्क केले. प्लेट ब्लेडिंग मशिन तयार केले. त्याचे व गिअर बॉक्सचे पेटंट मिळाले आहे. चित्रकलेची विशेष आवड. चित्रांचे बालगंधर्व रंगमंदिर येथे प्रदर्शन झाले आहे.

बासरी वादनाचेही कार्यक्रम केले आहे. कन्नड कवि द. रा. बेंद्रे यांच्या कवितांना चाली लावून त्याचा जाहीर कार्यक्रम पुणे येथील कन्नड संघात झाला. नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली या संस्थेने भारतीय उद्योगरत्न हा पुरस्कार नोव्हेंबर २००९ मध्ये दिला.

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मराठे प्रतिष्ठानची कार्यकारिणीची सभा शुक्रवार दिनांक २४ डिसेंबर २०१० ला उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी दुपारी ४ वाजता भरली. बैठकीला अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, श्री. सी. गो. खांबेटे, श्री. मोहनराव मराठे, श्री. प्रभाकर मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, श्री. सुहास मराठे उपस्थित होते.

मागील सभेचे इतिवृत्त वाचले. पुणे शाखेचा वर्धापनदिन दिनांक २६ जानेवारी २०११ला वेदोत्तेजक सभा, पुणे येथे साजरा होणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. 'हितगुज'च्या डिसेंबर अंकात हे छापता आले नाही कारण कार्यक्रमाचे निश्चित कुठे घ्यायचे ते ठरले नव्हते जेव्हा ठरले तेव्हा हितगुज अंक छपाईसाठी प्रेसमध्ये गेला होता असे संपादिकेने सांगितले. श्री. प्रभाकर मराठे हे जानेवारी २०११ नवीन वर्षात श्री. सुहास मराठे नवीन कोषाध्यक्ष यांच्या हातात सूत्रे सोपविणार असल्याचे ठरले.

प्रतिष्ठानचे खजिनदार चार्टर्ड अकौंटंट श्री. प्रभाकर दामोदर मराठे ह्यांनी अनेक वर्षे चोख, निरलसपणे, हिशेब व्यवस्थित सांभाळण्याचे, आय-व्यय-ताळेबंद पाहण्याचे काम केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. बँकेच्या नियमा-प्रमाणे पुढील कारवाई करण्याचे ठरले.

हितगुज छपाई खर्च, वितरणखर्च, डीटीपी खर्च मंजूर करण्यात आला. पुढची बैठक शुक्रवार दिनांक २१ जानेवारी २०११ ला घेण्याचे ठरले. चहापानानंतर सभा संपली.

शुक्रवार दिनांक २१-१-२०११ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक दुपारी ४ वाजता मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथे भरली. मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले.

श्री. श्रीनिवास अनंत मराठे (पृ.३९६) दादर, हे सभेला उपस्थित होते. त्यांनी आपल्या सर्व मराठ्यांचा डाटाबेस तयार करण्याची आवश्यकता प्रतिपादली आणि ते स्वत: या कामात लक्ष घालून त्याविषयी ते काय काय करू शकतात याविषयी माहिती सांगितली. त्यांना या कामात कोणी सहकार्य करणार असल्यास त्यांना त्या कामात मदत होईल असं सांगितले. पुढील कार्यवाही श्रीनिवास मराठे सुरू करतील. कुलवृत्तांत नूतनीकरणाबद्दलही चर्चा झाली. चहापान झाले. तिळगूळ वाटला. आभार प्रदर्शन होऊन सभा संपली. पुढील सभा दिनांक १८फेब्रुवारीला घेण्याचे ठरले.

## मानसन्मान

**चि. केतन नितीन चितळे,** रत्नागिरी याला मार्च २०१० मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत ९६.५% गुण मिळाले. त्याचा फाटक प्रशालामध्ये पहिला नंबर आला. गणित, सायन्स व संस्कृत ह्या विषयात सेंटपरसेंट मार्कस त्याला मिळाले आहेत. सौ. रेखा रा. चितळे यांचा केतन नातू आहे. चि. केतनचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा!

सौ. रेखाताईंना

स.न.

दिनांक १०-८-२०१०ला पाळंदे कुरिअरमार्फत पाठविलेली २००१रु. देणगी, स्टेट बँकेच्या क्रॉस ड्राफ्टने पाठविलेली व सोबत जोडलेले पत्र आजपावेतो मिळालेले नाही. क्षमस्व

संपादिका

## मानसन्मान

आपले कुलबांधव श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ. क्र. ३८०) बडोदे यांना 'फ्रेंडस ऑफ म्युझियम सोसायटी' व 'महाराजा फत्तेसिंह म्युझियम ट्रस्ट फॉर सिनिअर सिटीझन्स, बडोदे' त्या संस्थांतर्फे झालेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या निबंध स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. निबंधाचा विषय 'जुन्य बडोद्याच्या माझ्या स्मृती' असा होता.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. सदाशिव बळवंत मराठे ह्यांचे हार्दिक अभिनंदन!

('हितगुज'च्या या अंकात जागेअभावी तो प्रकाशित करण्यात आला नाही. पुढील अंकात तो प्रकाशित करण्यात येईल.

क्षमस्व - संपादिका)

## झाकलं माणिक : श्रीमती राधा श्रीकृष्ण ठाकूर (पद्मा माधव विद्वांस पृ. ६२३)

**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)**



श्रीमती राधा श्रीकृष्ण ठाकूर म्हणजे पूर्वाश्रमीच्या कु. पद्मा माधव विद्वांस. राधा ठाकूर यांचा जन्म दिनांक २६ एप्रिल १९५१ मध्ये झाला. सुविद्य आईवडील आणि हुशार भावंडे यांच्या संस्कारातच त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांची आई सुविद्य, तिचा जन्म १९१४ सालातील, तरीपण इंग्लिश अस्खलित बोलायची. वडील भाषांमध्ये पारंगत असल्याने त्यांना भाषांसाठी उत्तम मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे मॅट्रिकला मराठी, संस्कृत, हिंदी आणि इंग्रजी या चारही भाषांमध्ये त्यांना डिस्क्टिशन मिळाले. एसएससीला शाळेचे इंग्रजीचे प्रथम पारितोषिकही त्यांनी पटकावले. अभ्यासाव्यतिरिक्त शालेय आणि आंतरशालेय स्पर्धामध्ये वक्तृत्व, गीतगायन, अभिनय यात सतत अनेक बक्षिसे मिळाली. वडिलांनी त्यांना आर्टसला जायचे आहे का म्हणून विचारले परंतु त्यांचा विज्ञानाकडे कल होता, त्यांनी रुपारेल कॉलेजातून बॉटनी आणि झुऑलॉजी विषय घेऊन बीएस्ससी केलं, पुढे एमएसी, पीएचडी करण्याची त्यांची इच्छा होती; परंतु वडिलांच्या आग्रहामुळे त्यांनी बीएड केलं.

**जीवनसाथीची भेट**

रुपारेल कॉलेजमध्ये बीएस्ससीला असताना पद्मा यांची श्रीकृष्ण ठाकूर या असामान्य बुद्धीचा शास्त्रज्ञ, रुबाबदार तरुण वर्गमित्राशी भेट झाली. भेटीचे प्रेमात रूपांतर होऊन, माहेरून थोडासा विरोध असताना त्यांचा प्रेमविवाह यशस्वी झाला. श्रीकृष्ण ठाकूर यांनी वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी डॉक्टरेट मिळवली. Photo Phaneमध्ये मोठ्या अधिकारपदावर कार्यरत राहिले. इस्त्रोच्या सायंटिफिक लोकांसमोर त्यांची प्रभावशाली भाषणे व्हायची. उत्कृष्ट फोटोग्राफी ते करायचे. त्यांचे वन्यजीवन, पशु-प्राणी, पर्यावरण हे जिव्हाळ्याचे विषय होते. त्यासाठी तिघांनी पुष्कळ भटंकती केली. मुलगी कृपा हिला वाईल्ड लाईफची आवड लावली. पंधरा ऑगस्टला त्यांचा जन्म झाला म्हणून 'भारत' नावानेही त्यांना संबोधायचे. विवाह झाल्यावर पद्माचे नाव त्यांनी 'राधा' ठेवले त्यावर गमतीने त्या म्हणायच्या, ''भांडण करायला वावच ठेवला नाही 'राधा' नाव ठेवल्याने''

रुपारेल कॉलेजातील सहाध्यायी असलेला श्रीकृष्ण ठाकूर हा पद्मा विद्वांस यांचा आदर्श जोडीदार, जीवनसाथी झाला.

**उत्तम शिक्षिका**

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या लक्ष्मण-प्रसाद पोद्दार कन्या शाळेत (दादर) पद्मातार्इंनी ३५वर्षे नोकरी केली. सायन्स, गणित हे विषय त्या प्रामुख्याने शिकवितच; परंतु चारही भाषा चांगल्या अवगत असल्यामुळे वेळप्रसंगी त्याही शिकवित असत. मराठी विषय घेऊन एम.ए. झालेल्या शिक्षिकाही त्यांना शुद्धलेखन, व्याकरणाविषयी शंका विचारीत. पद्मातार्इंचे मार्गदर्शन त्यांना मोलाचे वाटे. चांगलं शिकवितात हा लौकिक त्यांनी संपादन केला.

वास्तविक शिक्षकी पेशा स्वीकारणे ही पद्मा-तार्इंची आवड नव्हती, पण एकदा स्वीकारलेले काम अत्यंत प्रामाणिकपणे करणे हे जणू त्यांचे व्रत होते. त्यामुळे शाळेत विद्यार्थिनीसाठी तन-मन-धन ओतून त्यांनी काम पाहिले. विद्यार्थिनींमध्ये उत्तम शिक्षिका म्हणून लोकप्रिय झाल्या. त्याहीपेक्षा सहकारी शिक्षिकांमध्येही लोकप्रिय झाल्या याचे मला कौतुक वाटते.

विद्यार्थिनींनी वक्तृत्व, वेशभूषा, संगीत, नृत्य, नाट्य यांचे मार्गदर्शन करून शाळेला, विद्यार्थिनींना आणि स्वत:ला अनेक बक्षिसे मिळवून दिली.

शालेय जीवनापासून आकाशवाणीवर कार्यक्रम व्हायचे. माया चिटणीस आणि नानूजी देसाई यांनी आकाशवाणी 'गंमत जंमत'मध्ये अचानक लाईव्ह बोर्ड कास्ट मध्ये गीत म्हणायला लावलं तेव्हा त्या कार्यक्रमामध्ये 'प्रभाती सूर नभी रंगती, दशदिशा भूपाळी म्हणती' हे गाणं पद्मातार्इंनी म्हटलं.

**फोटो काढायला विसरले.**

पद्माताई शिाक्षिका म्हणून कार्यरत असताना कुमारकला केंद्राच्या शिक्षकस्पर्धेत भावगीत गायनाचे आणि अभिनयातील पारितोषिके त्यांना मिळाली. बक्षिस समारंभाला प्रमुख पाहुण्या सुलभा देशपांडे होत्या. त्यांच्याहस्ते बक्षिस स्वीकारल्यावर त्यांनी पद्मातार्इंना ते गीत म्हणण्याचा आग्रह केला आणि अचानक रंगमंचावर पद्मातार्इंना गाऊन दाखववावे लागले. ते गीत होते 'सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या'. कुमारकला केंद्राचे श्री. अरविंद वैद्य हे फोटो काढायला म्हणून कॅमेरा हातात घेऊन बसले होते ते या गाण्यात इतके हरवून गेले की पद्मातार्इंचा फोटो काढायला विसरले. याचाच अर्थ पद्मातार्इंनी ते गीत भावपूर्ण, सुरेल सादर केले. नारायणराव व्यास हे त्यांचं गाण्यातले गुरू तर अभिनयात श्रीमती सुलभा देशपांडे, शिक्षक म्हणून सरस्वती गोखले (विद्याधर गोखले यांच्या पत्नी) ही त्यांची प्रेरणास्थाने आहेत.

**तुमची मुलगी म्हणजे हुकुमाचा एक्का आहे**

पद्मातार्इंच्या शाळेतल्या ताराबाई खेर चांगलं शिकवितात हा त्यांचा लौकिक होता. त्यांना 'राष्ट्रपती पुरस्कार' मिळाला. तेव्हा पद्मातार्इंच्या वडिलांनी त्यांना अभिनंदनाचे पत्र पाठविले. त्या वेळी ताराबाई पद्मातार्इंच्या वडिलांना म्हणाल्या,

''तुमची मुलगी हुकुमाचा एक्का आहे. जिथे जाईल तिथे बक्षिसे घेऊन येते अशा विद्यार्थिनींमुळे मला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला.''

**करिअरची राजधानी एक्सप्रेस**

मुंबई दूरदर्शनच्या शालेय चित्रवाणी कार्यक्रमात विज्ञान आणि इंग्रजी या विषयांचे ३०-४० कार्यक्रमांचे लेखन, सादरीकरण त्यांनी केले. तेव्हा आतासारखे शेकडो चॅनेल्स नव्हते त्यामुळे अनोळखी माणसे रस्त्यात भेटून त्यांना ''तुमचा काल टीव्हीवर कार्यक्रम पाहिला, चांगला झाला.'' असे सांगत.

नागपूर आकाशवाणीवर मुलांना निसर्गाची, पर्यटनाची आवड कशी लावावी या विषयावर वीस मिनिटे भाषण झाले.

सीसीआरटी सेंटर फॉर कल्चरल रिसोर्सेस अँड ट्रेनिंगतर्फे सबंध भारतातून तज्ज्ञ शिक्षकांना बोलावतात. १९८५ साली सबंध महाराष्ट्रातल्या नऊ शिक्षकांना बोलावले त्यात पद्माताईंची निवड झाली. पाच आठवडे दिल्लीला त्या राहिल्या आणि तिथे कार्यक्रम सादर केले.

**शिक्षकांची शिक्षिका**

महाराष्ट्र शिक्षण विभागाच्या शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष ETcell येथे Scriptwritten, Presentation म्हणून deputation वर काम करण्यासाठी पद्माताईंना मानाचे आमंत्रण आले होतं. त्यासाठी त्यांनी स्वत:हून अर्जही केला नव्हता. तिथे महाराष्ट्रभर जाऊन जिल्हा पातळीवर अनेक पाठलेखन, सादरीकरण, प्रशिक्षणवर्गाचे आयोजन व शिक्षकांना मार्गदर्शन केले. या अंतर्गत ५०-६० कार्यक्रमांचे लेखन, निर्मिती त्यांनी केली. त्याचबरोबर या कार्यक्रमांचे रेकॉर्डिंग, एडिटिंग इत्यादी तांत्रिक कामेसुद्धा केली. Why audio Visual education या विषयावर शिक्षक विभागाच्या अनेक शिक्षक प्रशिक्षण वर्गामध्ये Lecture Demonstration खास करून overhead projects आणि टेपरेकॉर्डचा एकत्र वापर कसा करायचा याचे मार्गदर्शन शिक्षकांना केले.

श्राव्य माध्यमातून परिणाम कसा झाला पाहिजे हे त्या स्वत: शिकल्या आणि शिक्षकांनाही त्यांनी शिकविले. त्यातूनच त्यांच्या स्वत:च्या प्रॉडक्शनची निर्मिती झाली. त्यांनी 'हमखास यश विज्ञान'च्या चार कॅसेट सेट काढला. 'सायन्स मेड इझी'च्या चार कॅसेट सेट तसेच Poems Made Easy या कॅसेटची केलेली निर्मिती विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त, मार्गदर्शक ठरली.

एकदा तर रात्री १०.३०वाजता एका पालकाचा फोन पद्माताईंना आला त्यांनी सांगितलं माझी मुलगी दहावीला आहे. तुमच्या कॅसेटस् लावून तिने भरपूर अभ्यास केला आहे तिची इच्छा आहे तुम्ही तिला परीक्षेसाठी बेस्ट लक द्यावं. फोनवरून पद्माताईंनी तिला शुभेच्छा दिल्या. ती विद्यार्थिनी असलेली मुलगी भरून पावली इतका तिला आनंद झाला.

विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी या कॅसेट्सचा खूप फायदा झाला; परंतु मनुष्यबळ पुरेसे पाठीशी नसल्यामुळे सर्वत्र व्हावा तसा प्रचार या कॅसेट्सचा झाला नाही याची खंत पद्माताईंनी बोलून दाखविली. आजही, काहीवेळा फारसा अभ्यास न केलेले विद्यार्थी पद्माताईंकडे शिकायला येतात तेही परीक्षा अगदी तोंडावर आलेली असताना शेवटच्या क्षणी पण पद्माताई त्यांनाही शिकवितात, आणि ती पास होतात. यावर पद्माताईंचा हुशार नातू सोहम् म्हणतो, ''आजी, आयसीयूतले पेशंट असावेत असे विद्यार्थी तुझ्याकडे येतात आणि तू त्यांना पास करून जीवदान देतेस.'' जणू काही नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पद्माताई या 'संजीवनी'चं ठरल्या आहेत.

पद्माताईंनी Lioyd Steel साठी In house Trainingसाठी इंजिनिअरिंग विषयावर इंजिनिअर्स-साठी व्हिडिओ फिल्मची निर्मिती केली आहे.

कौटुंबिक, घरच्या मंगलकार्याच्या कार्यक्रमात पद्माताई सूत्रसंचालन करतात. काव्यातून, गाणी सादर करतात. मनोरंजनपर कार्यक्रमाचे लेखन, निवेदन करतात.

**दुःखाचा आघात**

राधा-श्रीकृष्णाचे वैवाहिक प्रेमी जीवन बहरत असातनाच एक काळाकुट्ट अशुभ दिवस त्याच्या आयुष्यात आला. दिनांक ७ जुलै १९९१ला पद्माताईंचे पती श्रीकृष्ण ठाकूर हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने हे जग सोडून गेले. ऐन उमेदीच्या काळात एकाकी अवस्थेत पद्माताईंना लोटून त्यांची जीवनसाथ संपली. त्यांच्या दु:खाला पारावार राहीला नाही, परंतु एवढे मोठे पतिनिधनाचे दु:ख त्यांनी गिळले. त्यांची मुलगी कृपा त्यावेळी १२ वर्षांची होती. आता कृपाची आई होतीच पण वडील ही आपणच व्हायचे, वडिलांची उणीव, कमतरता तिला भासू द्यायची नाही या निश्चयाने पद्माताईंना दु:खाच्या आघातातून सावरावे लागले. १९९१ त्यांच्या कुटुंबाला वाईट साल गेलं. त्यांचे वडीलही ८ ऑगस्ट १९९१ला निधन पावले. परंतु त्यांच्या पाठीशी मोठी बहीण, भाऊ होते. सौभाग्याचे प्रतीक असलेले मंगळसूत्र त्यांनी गळ्यातून काढलं नाही. साधारणपणे 'संरक्षण' म्हणून स्त्रिया मंगळसूत्र घालतात; पण पद्माताईंचा हेतू प्रोटेक्शन मिळावे हा नाही तर मृत्यू व्यक्तीचा होऊ शकतो, नातं कधीच मरत नाही उलट नातं वाढतं. मग पवित्र प्रेमळ नात्यांचे प्रतीक जे मंगळसूत्र ते कशाला काढायचं? ही उदात्त भावना त्यामागे आहे.

**माझ्यासाठी नाही का तू चांगली दिसणार?**

श्रीकृष्ण ठाकूरांच्या निधनामुळे पद्माताईंचा मूड नटण्या-थटण्याकडे साहजिकच कमी झाला. यापूर्वी त्या साडीला मॅचिंग बांगड्या, तऱ्हतऱ्हेचे आकर्षक कानातले, केसात गजरा, फुले माळायच्या. परंतु नंतर आईचे हे अत्यंत साधं रूप पाहून एकदा कृपाने विचारले, ''बाबांसाठीच तू हे सर्व चांगले करीत होतीस का? माझ्यासाठी तू हे करणार नाहीस का? बाबांसाठी एवढे दिवस नटत होतीस, आता माझ्यासाठी दागिने घाल.''

दिनांक ७ जुलै १९९१ नंतर स्वत:च्या करिअरला पूर्णविराम देऊन सर्व लक्ष कृपावर केंद्रित केले. जगायचे ते कृपासाठीच. तिच्या शिक्षणाकडे, परफॉर्मन्सकडे लक्ष दिले. कृपा कमर्शिअल आर्टिस्ट, नृत्याबरोबर गातेही छान. तिचे लग्न निशान पाटीलबरोबर लावले. त्यालाही वडील नाहीत. तेव्हा कृपाचे कन्यादान पद्माताईंनी केले. निशानच्या आईने लग्नातले सर्व विधी केले. लग्नाला स्त्रीपुरोहित होती. दोन्ही आयांनी आपापल्या मुलांची लग्ने लावली. लग्नाचे मंगलविधी केले. या विवाहात सुधारक विचारसरणीचे दर्शन झाले.

पद्माताईंचा जावई निशान पाटील, मुलगी कृपा दोघेही एकमेकांना अनुरूप आणि अनुकूल. दोघेही कमर्शिअल आर्टिस्ट, दोघेही गायक, चित्रकार, क्रिएटिव्ह, सृजनशील निर्मिती करण्याची क्षमता असलेले, सारेगमप या हिंदी अंताक्षरी स्पर्धेत दोघांनी बक्षिसे मिळविली. सौ. कृपा क्वाड्रम पब्लिशिंग हाऊस मध्ये आर्ट डायरेक्टर तर जावई निशान पायीलल हंगामा डॉटकॉम मध्ये आर्ट डायरेक्टर, दोघेही त्यांच्या त्यांच्या

ठिकाणी मोठ्या पोस्टवर कृतीशील आहेत. त्यांची मिष्टी नावाची मुलगी नावाप्रमाणेच गोड, मिष्टान्नासारखी आहे. उपजतच तिला गाण्याची आवड आहे. ताल-ठेक्याची जाण आहे. चित्रकला ही तिची चांगली आहे. आई-वडिलांचे पुरेपूर चांगले गुण तिच्यात उतरले आहेत. सलग ३५ वर्षे नोकरी करून मिष्टीसाठी आठ महिने आधी सेवानिवृत्ती घेणारी तिची आजी हिऱ्याला चांगले पैल पाडून छानशा कोंदणात बसवणारच यात तीळमात्र शंका नाही.

स्वत:मध्ये इतके विविध गुण फुललेले असताना, अनेकवेळा प्रोफेशनल आर्टिस्टची संधी चालून आलेली असतानाही पद्माताईंनी ती नाकारली. कृपावर पितृछत्र धरले, तिला लहानाची मोठी करताना तिचे व्यक्तिमत्त्व सर्वांगांनी फुलविले. त्यासाठी अनेक गोष्टी त्यांना सोडाव्या लागल्या असतील, पण कुठे तक्रारीचा सूर नाही. स्वत:च्या हक्काच्या घरात न राहता नातीसाठी सोय म्हणून जावयाच्या घरी राहण्याचा प्रगत विचार करणारे मन त्यांच्यापाशी आहे. पद्माताई मुलगी कृपा-जावई आणि नात यांच्या विश्वात आनंदाने रमल्या आहेत. नाहीतरी दूधापेक्षा सायीवर अधिक प्रेम असते ही उक्ती पद्माताई स्वत:च्या उदाहरणाने सार्थ करून दाखवित आहेत. पद्माताई म्हणजे मराठ्यांच्या माहेरवाशिणींमधल्या 'झाकलं माणिक'!

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)

## ब्राह्मणसभा मुंबई - प्रज्ञावंत पुरस्कार प्रकट चिंतन

श्री. रत्नाकर सुंदर मराठे यांना ब्राह्मणसभा, गिरगाव, मुंबई या संस्थेच्या वतीने 'प्रज्ञावंत पुरस्कार' मिळाला. मराठे प्रतिष्ठानद्वारा त्यांचे हार्दिक अभिनंदन! त्यांनी सत्काराला उत्तर देताना भाषण केले ते प्रकाशित करत आहोत.

-संपादिका

आपण मला जो हा पुरस्कार देत आहात तो मी 'प्रज्ञावंत व्हावा' यासाठी आहे, असे मी मानतो.

प.पू.पांडुरंगशास्त्री आठवले यांनी स्थापन केलेल्या 'तत्त्वज्ञान विद्यापीठ, ठाणे' या संस्थेत १९६४ ते १९७३ राहून अध्ययन केले तसेच आजही त्यांच्या स्वाध्याय कार्यात सक्रिय सहभागी आहे, यामुळे हा पुरस्कार मिळाला आहे असे मी समजतो.

*ये शान्तदान्ता: श्रुतिपूर्णकर्णा: जितेन्द्रीया: स्त्रीविषये विरक्ता:*
*प्रतिग्रहे संकुचिताग्रहस्तास्ते ब्राह्मणास्तारयितुं समर्था:॥*

अशा ज्ञान, जितेंद्रिय, पैशालाच प्राधान्य न देणाऱ्या ब्राह्मणांचे संघटन करणाऱ्या संस्थेकडून हा पुरस्कार मिळाला आहे.

*'ब्राह्मणस्वस्यहि रक्षणेन रक्षित: स्यात् वैदिको धर्म:'* या शंकराचार्यांच्या उक्तीप्रमाणे संस्कृतीचे रक्षण ब्राह्मणत्वाचे संवर्धन केल्यानेच होईल म्हणून त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या संस्थेकडून हा पुरस्कार मिळत आहे म्हणून विशेष समाधान.

माझे वडील ब्राह्मण होते म्हणून मी ब्राह्मण आहे असे समजणारा ब्राह्मण नसावा तर 'ब्रह्म नामवेद तद् अध्ययनार्थं व्रतमपि ब्रह्म, तद् आचरति सब्राह्मण:' असे वेदांचे विचार समजून घेऊन त्याप्रमाणे वागणारा आणि ते विचार इतरांपर्यंत नेण्यासाठी नि:स्वार्थपणे झटणारा असावा.

*'अक्षरं ब्रह्म परमं (गीता८.२)'* ब्रह्म म्हणजे सृष्टीची उत्पत्ती, स्थिती, लय करणारा ईश्वर. तोच रोज सकाळी मला उठविणे, स्मृती देतो, भूक देतो. माझे अन्न पचवितो, रक्त बनवितो, झोप देतो आणि हे 'God is in the heaven and all is right with the world' कोठेतरी राहून नव्हे तर *'सर्वस्व चाहं हरि सन्निविष्टो' (गीता १५.१५)* माझ्या हृदयात राहूनच मला सांभाळतो आहे. अशा ईश्वराबद्दल स्वत: कृतज्ञ राहून इतरांच्यात ती कृतज्ञता यावी यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणारा तो ब्राह्मणक्ष

'संस्कारात् निज उच्यते' मौजीबंधन हा संस्कार फार महत्त्वाचा आहे, पण आज तो फक्त एकत्र येण्यासाठीच केला जातो. खरे तर 'जानवे' हे काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे मूर्तीवर प्राणप्रतिष्ठा करून तो विश्वचालक गणपती माझ्या घरी आला आहे या भावनेने प्रत्येकजण गणेशोत्सव साजरा करतो आणि 'यान्तु देवगणा: सर्वे पूजामादाय पार्थिवीम् इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनायच' या मंत्राने स्वस्थानी जा अशी प्रार्थना करून विसर्जन केल्यावर मूर्ती जलाशयात सोडतो. (गणपती बुडवीत नाही) अशी समज उभी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सुताच्याच जानव्यावर (ऐपतीप्रमाणे सोन्याचांदीच्या नव्हे) ॐकारं प्रथमतंतौन्यसामि 'पासून' विश्वम् देवान् नवमतंतौ न्यासामि' इत्यादी मंत्रानी सर्व देवतांचे स्वत: आवाहन करून या सर्व देवता सतत माझ्यासोबत आहेत ही जाणीव उभी करणे म्हणजेच मौजीबंधन आणि ती दृढ ठेवण्यासाठी श्रावणी. याद्वारे भगवंताचे सामीप्य, सान्निध्य आणि संबंध (त्वमेव माताच पिता त्वमेव) याची जाणीव दृढ करणारे ते जानवे.

'वर्णानां ब्राह्मणो गुरु:' सर्व माणसामाणसात ईश्वराविषयी प्रेमभाव निर्माण करणारा आणि त्याद्वारे विश्वातील माणसामाणसात 'पिताहयस्य जगतो माता धांता पितामह:' (गीता ९.१७) देवाच्या पितृत्वाखाली बंधुत्व निर्माण व्हावे यासाठी 'हा देह तुझा असे' याप्रमाणे झटणाऱ्या सुदाम्याप्रमाणे संस्कृती संवर्धनासाठी प्रयत्न करणारे ब्राह्मण तयार करण्यासाठी या ब्राह्मण सभेने प्रयत्न करावा.

असे संस्कृतीसंवर्धनाचे कार्य या ब्राह्मणसभेकडून व्हावे अशी भगवंताच्या चरणी प्रार्थना करतो. आणि माझा सत्कार केल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी सदस्य यांना धन्यवाद देतो. इति अलम्

**- रत्नाकर सुंदर मराठे (पृ.३६५)**

मु.पो. पाली, ता. सुधागड जि. रायगड ४१० २०५ दूरध्वनी : ०२१४२-२४२८१०

प्रवासवर्णन

# सुंदर कुर्ग भेट

श्री. मोहन मराठे (पृ.३६५)

बंगलोरहून आम्ही कारने दुपारी १॥वा कुर्गकडे निघालो. म्हैसूरच्या रस्त्यावर श्रीरंगपट्टणला उजवीकडे वळून कावेरी नदीच्या बाजूने गेलो. पेरियापटनापासून आम्ही कुर्गमध्ये प्रवेश केला व मालदरे (सिद्धपूर) ह्या गावातील एका कॉफी मळ्याच्या मालकाच्या बंगल्यातील ब्राईट स्पॉट ह्या खासगी होम स्टे मध्ये रात्री ८वाजता पोहोचलो. यजमानांनी अगत्यपूर्वक उत्तम स्वागत केले. सुमारे २५०कि.मी.प्रवास झाला. कुर्ग जिल्हा कॉफी मळ्यांचे आगर आहे. ह्या भागात अनेक कॉफीमळे आहेत. अनेक खासगी कॉफी मळ्यांचे लहान मालक आपल्या बंगल्याशेजारी ३-४ स्वयंपूर्ण खोल्या बांधून प्रवाशांसाठी राहण्याची, जेवणाची उत्तम व्यवस्था माफक दरात करतात. येथे अनेक महाग हॉटेल्स व रिझॉर्टस आहेत, पण इथे आपुलकीने मुख्यत: शनिवार-रविवारी येणाऱ्या प्रवाशांची व्यवस्था करतात. दूध, भाज्या, धान्य घरचेच असते. शेतामध्ये कॉफी, नारळ, सुपारी, भाज्या, तांदूळ, मका, मिरी, आले, मिरची, हिंग इत्यादींचे उत्पन्न होते. सकाळी उठल्यावर भोवताली अॅथ्रोनियम जास्वंद, कमळ, गुलाब, गोकर्ण, जाई-जुई, मोगरा अशा अनेक फुलांचे ताटवे पाहून मन प्रसन्न झाले. निसर्गरम्य हिरवाई, शुद्ध हवा ह्यामुळे भूक चांगली लागते व यजमानांचे स्वादिष्ट शाकाहारी, मासाहारी जेवण, नाश्ता तृप्त करते.

ह्याठिकाणी आम्ही दुबारे, निसर्गधाम, बौद्ध मोनॅस्टरी, सिद्धपुर मार्केट ह्या ठिकाणांना भेटी दिल्या. त्याच्या वर्णनापूर्वी आपण कुर्गची माहिती घेऊ.

कुर्ग हा कर्नाटकाचा एक लहानसा जिल्हा पश्चिम घाटात वसलेला आहे. ह्याचे मुख्य ठिकाण मडिकेरी (मर्कारा) हे समुद्रसपाटीपासून ४००० फुटावर वसलेले आहे. हा संपूर्ण जिल्हा डोंगराळ असून साग व इतर झाडे, बांबू ह्यांची घनदाट जंगले आहेत. सपाट जागेवर चहा (मुख्यत:) कॉफी, नारळ, सुपारी, मोसंबीच्या बागा आहेत. शेतामध्ये भात, मका, भाजीपाला, मिरी, हिंग, वेलदोडे, आले इ. पिके घेतली जातात. सर्व प्रदेश वर्षभर हिरव्यागार वनश्रीने नटलेला असतो. दृष्टी खिळवून ठेवणाऱ्या ह्या भागाला भारताचे स्कॉटलंड असेही म्हटले जाते.

कुर्गचे मूळ नाव कोदाई मलेंदु म्हणजे कानडीमध्ये उंच डोंगरावरील घनदाट अरण्य असा अर्थ होतो. काही जणांच्या मते कोदवा शब्द कानडीत कोद म्हणजे देणे + आवा म्हणजे आई असा होतो. अशी दात्री कावेरी नदी तलकावेरीत उगम पावते व तिला सर्व भागात पूज्य देवता मानतात.

ह्या जिल्ह्यात कोदवा ही मुख्य जमात आहे. आर्थिक व राजकीयदृष्ट्या ती सर्वांत प्रबळ आहे ह्याखेरीज तूळ, गौडा, भोपळा इ. जातीचे लोक राहतात. कुर्गच्या लोकांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती लढाऊ जमात आहे. लष्करी पेशाचे आकर्षण आहे. ह्या भागात आपल्याला जनरल करिअप्पा, जनरल थिमय्या यासारखे कसलेले सेनानी दिलेले आहेत.

हा जिल्हा देशाच्या कॉफी उत्पादनात आघाडीवर आहे. कॉफीच्या मुख्य दोन जाती अरेबिका व रोबस्टा ह्या आहेत. आपल्याकडील मूळ कॉफी अरेबिका असून त्याची झाडे नाजूक असतात. सतत फळे येत असतात. त्यातील लाल फळे खुडून, वाळवून, बिया काढून, भाजून कॉफी पावडर बनवली जाते. ह्या जातीस मनुष्यबळ जास्ती लागते. रोबस्टा ही कॉफी ब्राझिलमधील असून नावाप्रमाणे ते रोबस्ट (कणकर) असते. त्याची फळे ठरावीक हंगामात येतात. ती एकावेळी खुडता येतात. अरेबिकापेक्षा त्याची पाने मोठी व झाडाची उंची पण जास्त असते. सर्वसाधारणपणे ह्या दोन्ही कॉफीच्या बिया एकत्र दळून पावडर बनवली जाते. चिकोरी वनस्पती उत्तर भारतात होते. तिची मुळे ह्या भाजलेल्या कॉफी बियात मिसळून एकत्र दळली जाते. तिला चिकोरी कॉफी म्हणतात. भारताला (उसाप्रमाणे) ब्राझील देशाच्या चढाओढीला तोंड द्यावे लागते. येथील लहानलहान हजारा कॉफी उत्पादक कॉफी बी वाळवून त्याची बाजारात विक्री करतात. घरात लागणारी कॉफी ते बाहेरून घेतात.

### स्थळांना भेटी

**१. दुबारे :** दुबारे हे गाव कावेरी नदीच्या काठी असून ते कुशलनगर-सिधपुर रस्त्यावर आहे. कावेरी नदी नावेतून पार करून पलीकडे गेलो तिथे जंगलातील हत्तींना पकडून माणसाळण्याचा कँप आहे. हे काम प्रशिक्षित हत्तींच्या मदतीने केले जाते. हत्तीला पकडून ६ महिने सागवानी लाकडाच्या मजबूत पिंजऱ्यात जखडून ठेवले जाते. माहूत फावल्या वेळात प्रवाशांना प्रशिक्षित हत्तीवरून जंगलाचा फेरफटका करून आणतात. ह्या भागात कावेरी नदीत रॅफ्टिंगची सोय आहे. रबरी सूट घालून ७ कि.मी. लांबीचा फेरफटका नदीतून करतात. पुराच्या काळात (सध्या) माणशी ६००रुपये आकारले जातात. कुशल नावाडी साथ देतो तिथून जवळ मासे पकडण्याचा अँगलिंगचा खेळ खेळता येतो.

**निसर्गधाम :** कावेरी नदीत बेटासारखे असणारे हे ठिकाण मडिकेरीपासून ३६कि.मी. व दुबारेपासून ८ कि.मी. वर आहे. टुरिस्ट स्पॉट म्हणून ह्याचा विकास करण्यात आला आहे. सुरुवातीला खाण्यापिण्याची, शॉपिंगची, राहण्याची व्यवस्था आहे. हलणाऱ्या पुलावरून कावेरी ओलांडून गेल्यावर रम्य जंगलात फेरफटका करता येतो. माचाणे आहेत, हरणे आहेत. ससे, बदक आहेत. बाजारात स्थानिक हस्तकला वस्तू, मध, मसाल्याचे पदार्थ विकत घेता येतात.

**बौद्ध मॉनॅस्टरी : सुवर्ण मंदीर :** चीनने तिबेट बळकावल्यानंतर बौद्ध धर्मीय देशोधडीला लागले. भारतात अनेक ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. कुर्गमध्ये कुशलनगर जवळ बैळकुप्पे येथे तिबेटी बौद्धांची सर्वांत मोठी वसाहत आहे. १९६३मध्ये पेमा नोखु रिंपोचे ह्या तिबेटमधून आलेल्या महान साधकाने ही मोनॅस्टरी

स्थापन केली. दलाईलामाने येथे भेट देऊन त्याला आशीर्वाद दिले व त्याला नामड्रोलिंग मोनॅस्टरी हे सुटसुटीत नाव दिले. येथे बौद्ध धर्म शिकवणुकीचे सर्वात मोठे केंद्र आहे. इथे ५००० विद्यार्थी बौद्ध धर्माची दीक्षा घेत असतात. मंदिरात बुद्धाची ५४ फूट उंचीची प्रचंड मूर्ती आहे. दोन्ही बाजूला एक-एक शिष्याची ५२ फूट उंचीची मूर्ती आहे. तिन्ही मूर्ती सुवर्णाने मढवल्या आहेत. सोने मढवण्याचे काम सन १९९९ मध्ये पूर्ण झाले. म्हणून ह्याला सुवर्णमंदिर म्हटले जाते. मूर्तीभोवती अगणित वस्तू मांडलेल्या आहेत. मंदिराचा हॉल प्रचंड असून एकावेळी हजारो स्नातक प्रार्थना करू शकतात. मंदिरात बौद्ध साधूंची असंख्य पेंटिंग्ज आहेत. परिसर अत्यंत रमणीय आहे. घंटा, पॅगोडा, त्यावरील रंगीत चित्रे अप्रतिम आहेत. शांत वातावरणाचा आनंद आहे.

सिद्धपूर मार्केट : ह्या मार्केटमध्ये कॉफी, लवंग, दालचिनी, मिरे, मध मिळतो. कॉफी उत्पादक वाळवलेले कॉफी बी (अरेबिकाचे हिरवट पांढरे व रोबस्टाचे काळे) बी दुकानात भाजायला व दळायला आणून देत होते. त्यांच्या कॉफीची विक्री होत होती. आपल्यासारख्या बाहेरच्या प्रवाशांना दुकानदार कॉफी पावडर विकत होता. इन्स्टंट कॉफी पावडरही विकत मिळाली.

**- श्री. मोहन मराठे (पृ.३६५)**
५, रामभुवन, अहिंसा मार्ग,
खार (प.) मुंबई ४०० ०५२
दूरध्वनी : ०२२-२६४६४३५१
मोबाईल : ९८१९९९६४७६५



**Dr. EKNATH VYANKTESH MARATHE**; B.Sc., M.Sc., Ed.D.; (Page No. 392)

Passed away on Dec. 29, 2010 in his 87th year, at St. Catharines General Hospital, He was born in Mumbai, Maharashtra, India on June 1st, 1923, the son of Vyanktesh Vishwanath and Janaki Agashe. Beloved husband of 58 years of the late Suniti Marathe. Beloved father of Aruna Marathe (Gordon Banting) of Calgary. AB and Sanjay Marathé of St. Catharines, Ont. Loving grandfather of James Rajiv Banting of Calgary, AB and Janaki Catherine Grace Banting of Calgary, AB and Montreal, PQ. He was predeceased by his wife Suniti, his brother Gopal Vyanktesh Marathe and sister-in-law Manorama Marathé. He leaves behind his children, grandchildren and many nieces and nephews, both in Canada and India.

Dr. Marathe was a dedicated physicist and science educator who taught several generations of St. Catharines students not only the fundamentals of science but also taught a love of life-long learning. “Doc” taught in the Lincoln County School System for 27 years, at St. Catharines Collegiate Institute and as Head of the Science Dept. at Grantham High School. Prior to that, he taught at universities in Canada and India. Dr. Marathe also worked in science research for 5 years in India. Both during and after his teaching career he worked on curriculum development in science education and wrote and published in the subject area. He believed in making science accessible and interesting for everyone.

After his retirement he was a visiting professor in India and published regularly in international scientific and educational journals. He also presented papers and attended international conferences in Canada, United States, Israel, Australia, New Zealand, Germany, U.S.S.R., France, the Netherlands and Thailand, China.

Dr. Marathe was twice nominated for the Science Teaching Award, Professional Engineers of Ontario, and was the recipient of the Dr. S.G.B. Robinson Travelling Fellowship of the Ontario Secondary School Teachers’ Federation, the recipient of the Science Teachers’ Association of Ontario Service Award for outstanding contributions to Science Education in Ontario and the recipient of the Canadian Healthy Environment Award from Environment Canada.

He was the founding president of the India Canada Association of the Niagara Region and served several years on the executive. He was also a member of the Ecological and Environmental Advisory Committee of the Regional Municipality of Niagara. He also regularly contributed information and articles on science to various newspapers and magazines. Dr. Marathe was a long-time member of the St. Catharines Torch Club and was on the Editorial Advisory Committee for the Torch magazine of the International Association of Torch Clubs.

Dr. Marathe enjoyed meeting his many former students and expressed a great deal of pride in their careers and accomplishments.

Funeral Arrangements have been entrusted to the GEORGE DARTE FUNERAL CHAPEL, (905) -937- 4444. A Private Family Service will take place. Cremation to follow. According to his wishes, please no flowers or sympathy cards or visitation. If desired, donations in his memory can be made to the Maharashtra Seva Samiti Organization, 4 Strathbury Circle SW, Calgary, AB, T3H 1P7 or the Salvation Army, or an educational institution of your choice.

# वन्समोअर

**श्री. वि. म. मराठे (पृ.२३५)**

''मध्या लेका, तुला मांजराचा आवाज काढायला सांगितला होता, पण तू कसला आवाज काढलास? तुझा आवाज ऐकून ते मांजर घाबरून गेले असेल व आणखी आतल्या कपारीत जाऊन बसले असेल.'' अपार्टमेंटचे सेक्रेटरी यांनी असे सुनावले तेव्हा मधूने मान खाली घातली. ''मला मांजराचा आवाज काढता येत नाही असे मी अगोदरच सांगितले होते. पण तुम्ही सर्वांनी मला जसा येईल तसा काढ असे सांगितलेत म्हणून मी प्रयत्न केला. तुमच्या सर्वांच्या प्रयत्नात माझी फूल ना फुलाची पाकळी असावी एवढीच माझी इच्छा होती. पण तुम्हाला ती पसंत पडली नाही. ठीक आहे.'' एवढे म्हणून मधू कोपऱ्यात जाऊन उभा राहिला.

नवीन वसाहत झालेल्या गणेश कॉलनीत मोहिनी अपार्टमेंटमध्ये आज सकाळपासूनच गडबड उडाली होती. अपार्टमेंटच्या मागील कोपऱ्यात गेले रात्रभर म्याँव म्याँव असा मांजराचा केविलवाणा आवाज ऐकू येत होता. रात्रीच्या शांततेत त्या आवाजाने सर्वांची झोपमोड झाली होती. पण रात्र असल्याने कोणी तिकडे जाऊ शकत नव्हते. तरी पण आपल्या हक्काविषयी जागरूक असणाऱ्या काहींनी रात्री फोनवरून ''अहो देशपांडे मांजराचा आवाज ऐकू येतो का? काही करणार आहात का? की आमची झोपमोड अशीच चालू राहणार आहे?'' असे देशपांडे यांना सुनावले होते. देशपांडे सोसायटीचे सेक्रेटरी असल्याने ती त्यांचीच जबाबदारी असे सर्वजण समजून होते.

मांजराचा आवाज जसा सर्वांना ऐकू येत होता तसा तो देशपांडेंनाही ऐकू येत होता. पण रात्र असल्यामुळे ते काही करू शकत नव्हते. सर्व सोसायट्यांमध्ये असते तसे या सोसायटीतही काहीजण सेक्रेटरीच्या बाजूने व काही त्यांच्या विरुद्ध होते. आपल्या बाजूने असलेल्या काही सभासदांना रात्री बोलावून देशपांडेंनी सल्लामसलत केली होती व मांजराचा आवाज ऐकू येतोय ते मांजर विहिरीतच पडले आहे का ते बघायचे, व तसे पडले असेल तर काय करायचे, याची कच्ची योजना तयार केली होती. पण हे सगळे करण्यासाठी सकाळ होण्याची वाट बघणे जरूर होते. बराच वेळ जागरण झाल्यामुळे देशपांडे यांना पहाटे झोप लागली. सकाळी त्यांच्या दाराबाहेर गलका ऐकू आला त्यामुळे ते जागे झाले. तोच ''अहो, सेक्रेटरीसाहेब उठला की नाही.'' असा आवाज ऐकू आला. व त्याबरोबरच कर्कश्श आवाजही ऐकू आला. एकदा तोंडाने ओरडल्यावर परत बेल दाबण्याची काही जरूर नव्हती. पण काहींचा स्वभाव इतका उतावीळ असतो की त्यांना कोणत्याही गोष्टीत दम धरवत नाही. बाहेर जमलेल्यांमध्ये काही शेजाऱ्यांबरोबर काही बायका, मुलीही होत्या. सर्वजण आता देशपांडे यांचेबरोबर विहिरीवर जाऊन मांजर बाहेर काढण्याच्या मोहिमेत सामील होणार होते. काही जणी ''अहो काका, ते मांजर बाहेर काढायचेच बरं का. रात्रभर मेल्याने सर्वांना जागविले आहे. आज रविवार होता चांगलं आरामात उठण्याचा विचार होता.'' असे म्हणत होत्या, तर काहीजण 'जरा सर्वजण गप्प बसा. काय करायचे आहे त्याचा विचार करायला त्यांना वेळ मिळू दे. त्यांचेवर ही पहिलीच वेळ आहे.' असे म्हणून जरा त्यांना सावरून घेत होते.

''अहो, त्यांची ही पहिलीच वेळ आहे हे आम्हाला मान्य आहे. पण सेक्रेटरी म्हणून काही जबाबदारी आहे की नाही? रात्रभर ते मांजराचे ओरडणे ऐकू येत होते. त्यांनी निदान तिकडे जाऊन बघितले आहे का हे त्यांना विचारा. बघितले असेल तर उपाय सापडेल ना! घरात बसून कसा काय उपाय सापडणार बरं?''

प्रत्येक जण देशपांडे यांना बोलू न देता आपसात चर्चा करीत होते. त्या सर्वांना हॉलमध्ये बसवून देशपांडे अंघोळ वगैरे करून आले. ते तिथून कधी सटकले होते ते कुणालाच कळले नव्हते.

हॉलमध्ये येताच देशपांडे यांनी जरा मोठ्या आवाजात सर्वांना गप्प बसण्यास सांगितले व आता संभाषणात भाग घेऊन सांगू लागले, ''तुम्हाला जसा मांजराच्या ओरडण्याचा त्रास झाला तसा मलाही झाला.'' देशपांडे यांचे पुढील वाक्य पुरे होण्याअगोदरच 'अहो झाला काय म्हणताय, होतोय म्हणा. अजूनी ओरडणे चालूच आहे ना?'' एका शेजारणीने मध्येच आवाज काढला. त्यांच्याकडे जरा रागानेच कटाक्ष टाकत देशपांडे यांनी आपले भाषण सुरू केले. ''बरं, होतोय म्हणा. तसा मलाही होतोय. मी काही बहिरा नाही. ते मांजर विहिरीत पडले असेल तर बाहेर काढण्याची जबाबदारी माझी एकट्याची नाही. तुम्हाला माहीतच आहे की त्या विहिरीभोवती बरेच गवत वाढलेले आहे. त्यामुळे रात्री मी तिकडे जाऊ शकलो नाही. आता तुम्ही सर्वांनी मदत केली तर ते काम लवकर होईल. आपण आता सर्वजण तिकडे जाऊ आणि पुढील प्रयत्न काय करायचे ते ठरवू.''

एवढे सर्व झाल्यावर सर्वजण विहिरीकडे जाण्यास निघाले. तिकडे जाता जाता एकमेकात, 'कसे पडले असेल, कालपासून उपाशी आहे बिचारे. आता लवकर बाहेर काढले नाही तर त्याचा आवाज मंद मंद होत जाईल व शेवटी बंद होईल.' असे कोणीतरी म्हणताच, 'अहो, जरा सिरियस व्हा. मंद मंद, बंद बंद असे अनुप्रास जमवून विनोद करण्याची ही वेळ आहे का? आता जरा गप्प बसा व आत डोकावून बघा.' सर्वांनी अता डोकावून बघितले. मांजराचा आवाज ऐकू येत होता, पण दर्शन होत नव्हते. ते कोठे तरी कपारीत लपले होते. ते बाहेर काढण्यासाठी कोणीतरी मांजराचा आवाज काढायचा ही कल्पना लढविली गेली होती व मधूला तो नाही म्हणत असताना जसा येईल तसा तू मांजराचा आवाज काढ असे सांगितले गेले होते. पण मधूला ते जमले नाही व ती कल्पना फेल गेली...

''हे बघा देशपांडे, मधूला आवाज काढता

आला नाही हे खरे आहे. पण ते मांजर बोका आहे की मांजरी आहे आपणाला माहीत नाही. दोघांचे आवाज वेगळे असतात. त्यामुळे कोणत्या आवाजाला प्रतिसाद देण्यासाठी कोण बाहेर येईल आणि...'' ''व्हाईस व्हर्सा'' कोणीतरी वाक्य पूर्ण केले. आणि सर्वांनी क्षणभर हसण्याचा आनंद घेतला व परत सर्वजण विहिरीत डोकावून बघू लागले. ''हे बघा, मी सांगतो, पटते का बघा.'' असे म्हणून अपार्टमेंटचे गणेश उत्सवाचे सेक्रेटरी सांगू लागले, ''मागच्या वर्षी आपल्या गणेश उत्सवात आपण नकलांचा कार्यक्रम केला होता. तो कोष्टी आठवतोय का? त्याने निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज अगदी हुबेहूब काढले होते. त्याला बोलावू, म्हणजे तो दोन्ही आवाज काढेल.'' नकलाकार कोष्टीला मांजराचे आवाज काढण्यासाठी बोलाविण्याची कल्पना सर्वांना पसंत पडली. त्याला बोलाविण्याचे ठरले. ''कोष्टीला बोलावताय, पण त्याचे मानधन किती असते याची कल्पना आहे का? नीट विचार करून बोलवा नाही तर मांजर बाहेर काढणं महागात पडायचं.'' एकाने शंका काढलीच.

''महाग पडायचं म्हणे. मग काय करायचं ते सांगा. स्वत: काही करायचे नाही पण चालू कामात खीळ घालायचं बरं जमतं तुम्हाला.'' दुसरा आवाज.

''अरे बाबांनो, गप्प बसा. आधी तो कोष्टी सापडतोय का बघा? मग पुढचा प्रश्न.'' अशी प्रश्नोत्तरे चालू झाली. आणि थोड्याच वेळात कोष्टीच्या विषयावर पडदा पडला. कोष्टी गावात नव्हता. तेवढ्यात विहिरीतून म्यॉंव म्यॉंव असा आवाज आला. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. आता त्याला बाहेर काढायची तयारी सुरू करण्यास हरकत नव्हती.

विहिरीतून मांजर कसे बाहेर काढायचे हे काही कोणी कुणाला शिकवायची जरूरी नव्हती. एक दोरी घ्यायची. एक बादली घ्यायची. दोरी बादलीला बांधायची व मांजर जिथे बसले आहे तिथे सोडायची! प्रश्न होता तो सोडलेल्या बादलीत मांजर येण्याचा. पण प्रयत्न करणं भाग होतं.

देशपांडेनी बादलीला दोरी बांधणे सुरू केले. त्यांनी दोरी बांधली व हाताने ओढून गाठ घट्ट बसली की नाही ते बघत असतानाच जोशी वहिनींनी सूचना केल्या ''काका गाठ घट्ट मारा बरं का? व आता सोडताना पण काळजी घ्या. नाहीतर समोरच्या बाजूवर आपटून बादली फुटेल.''

''अहो जोशी वहिनी, काकांना तेवढं समजत बरं का. तेवढं सांगायला नको.'' काळे वहिनींना उगीचच मध्ये तोंड घातले.

''सांगायला नको म्हणजे काय? माझी बादली आहे म्हणून सांगितले. अगोदरच सांगितलेले बरं! नंतर सांगून काय उपयोग? आणि शेवटी बादली आमचीच उपयोगी पडली ना? इतरांच्याकडे काय बादल्या नव्हत्या काय? पण अशा वेळी कोणी देत नाही. मग काय काकांना आम्हीच दिसतो. हो की नाही पाटीलवहिनी?'' जोशी वहिनींनी पाटीलबाईंना विचारले. दोरी पाटीलबाईंची होती. त्यामुळं त्या हो म्हणणार याची त्यांना खात्री होती.

''हो ना! दोरी शेवटी आम्हीच दिली ना? मागायला आल्यावर काय नाही म्हणता येतंय थोडंच! दोरीवर ओले कपडे होते ते काढून ठेवलं व दोरी दिली. आता नीट परत येऊ दे म्हणजे मिळवली.'' पाटील बाईंनी जोशीबाईंना सपोर्ट देताना आपली बाजू मांडली.

''तुमच्या दोरीला काही होणार नाही हो. त्या मरतुकड्या मांजराचे वजन ते काय असणार! मांजर पाळायचे म्हणजे त्याला खायला घालावे लागते. ते तर कोण करत नाही पण आपले मांजर आहे हे दाखविण्यासाठी गळ्यांत बांगडी मात्र अडकवून ठेवतात.''

''अहो वहिनी, गळ्यात बांगडी अडकवितात ती दुसऱ्या मांजराने गळा पकडू नये म्हणून''

## सहवेदना

श्री. श्रीकांत नारायण मराठे, नौपाडा, ठाणे यांच्या मातोश्री सौ. उषा नारायण मराठे, वय ८२ यांचे ठाणे येथील हॉस्पिटलमध्ये दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजी निधन झाले. तसेच वडील ती. नारायण त्रिंबक मराठे, वय ८४ यांचे वृद्धपकालीन आजारामुळे दिनांक २१ जानेवारी २०११ रोजी निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो!

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. विष्णू रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**फळ नसलेल्या झाडांना दगड कोणी मारीत नाही.**

## SOURCE IINTERNET

Professor Ernest Brennecke of Columbia is credited with inventing a sentence that can be made to have eight different meanings by placing ONE WORD in all possible in the sentence : "I hit him in the eye yesterday"

The Query : What is this word?

The Answer : The word is "ONLY'

The Message :

1. **ONLY** I hit him in the eye yesterday. (No one else did.)
2. I **ONLY** hit him in the eye yesterday. (Did not slap him.)
3. I hit **ONLY** him in the eye yesterday. (I did not hit others.)
4. I hit him **ONLY** in the eye yesterday. (I did not hit outside the eye.)
5. I hit him in **ONLY** the eye yesterday. (Not other organs.)
6. I hit him in the **ONLY** eye yesterday. (He doesn't have another eye.)
7. I hit him in the eye **ONLY** yesterday. (Not today.)
8. I hit him in the eye yesterday **ONLY**. (Did not wait for today.)

**-प्रेषक : श्री. रमाकांत विद्वांस (पृ.६२३)**

असे म्हणत मधूने मध्येच तोंड घातले व सहज चाळा म्हणून हातातला खडा मांजराच्या दिशेने विहिरीत भिरकावला. थोडेच चुकले नाही तर दगड मांजराला लागला असता. तेवढ्याने मांजर मात्र घाबरले व त्याने जोरात म्यॉंव म्यॉंव असा आवाज काढला.

या सर्वांची आपसात बडबड चालू होती. पण त्याकडे लक्ष न देता देशपांडे यांनी बादलीला दोरी बांधण्याचे काम पूर्ण केले होते व आता ते बादली आत सोडण्यास तयार झाले होते. त्यांनी बादली सोडायची पोज घेतली आणि सर्वांच्या गणपती बाप्पा मोरया या आवाजात ती आत फेकली. पण दोरी पुरती सोडली गेली नव्हती. त्यामुळे ती मध्ये लटकून भिंतीवर आपटली. परत वर घेऊन पूर्ण दोरी हातात घेऊन बादली आत फेकली. आता मात्र ती बरोबर मांजराच्या जवळ पडली. पण ते घाबरून बाजूला गेले. त्याने बादली यावे म्हणून काहींनी शुक शुक असा आवाज काढला. काहींनी पिस पिस असा आवाज काढला. पण ते बादलीत येईना. बराच वेळ दोरीची हालचाल करून प्रत्येक जण दमून गेला होता. आता शेवटचा उपाय म्हणून बादलीत काहीतरी खाण्याचा पदार्थ ठेवल्यास तो खाण्यासाठी ते बादलीत येईल असा उपाय सुचल्यावर एकदा दूध, एकदा लोणी, एकदा दूधभात असे निरनिराळे उपाय करून बघितले. पण मांजर बादलीत येईना. सर्वजण कंटाळले होते. बारा वाजून गेले होते. सर्वांना भूक लागली होती. तेव्हा आता शेवटचा उपाय म्हणून लोणी लावून ब्रेडचा तुकडा बादलीत ठेवायचा व पाळीपाळीने एकाने तिथे थांबायचे व मांजर वर आली की बादली वर ओढायची असा निर्णय घेऊन एक ब्रेडचा तुकडा लोणी लावून बादलीत ठेवला व बादली आत सोडली. दोघेजण तिथे थांबून बाकीचे निघण्याच्या तयारीत होते. तेवढ्यात मांजराने झेप घेऊन बादलीत प्रवेश केला. सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. सकाळपासूनच्या प्रयत्नाला आता यश येणार होते. दोरी वर ओढून घेतली. बादली विहिरीबाहेर काढताच मांजराने बाहेर उडी घेऊन धूम ठोकली. आता दोरी सोडून बादली मोकळी करण्याचे काम सुरू झाले. बादली मोकळी झाली आणि विहिरीतून पुन्हा म्यॉंव म्यॉंव असा आवाज ऐकू आला. सर्वांनी आत डोकावून बघितले.

आणखी एक मांजर त्याला वर घेण्यासाठी केविलवाण्या नजरेने वर बघत होते व बादलीची सोडलेली गाठ परत बांधण्यासाठी देशपांडे तयारी करत होते. त्यांच्या कामाला वन्समोअर मिळाला होता.

**- श्री. वि. म. मराठे (पृ.२३५)**
'पद्मश्री' महाराष्ट्र बँकेशेजारी, विश्रामबाग
सांगली ४१६ ४१५

JAKHOTIYA & ASSOCIATES
MANAGEMENT CONSULTANTS

**➤ Our services**

- Business consultants in the areas of Strategic Management, Financial Management, Human Resource Management & Entrepreneurship Management
- Corporate Training in the areas of Strategy, Finance, HR & Entrepreneurship

**➤ Our Team**

**Dr. Girish Jakhotiya** is the chief consultant who is assisted by **Manjiri Jakhotiya (Marathe)**, a senior consultant and other co consultants.

**➤ Special Achievement**

**AGNI (Aggregate Growth through Networking & Innovation),** a Strategic Planning & Monitoring Tool, is in the process of getting patented under the Indian Patents Act.

**➤ Our Valuable Clients**

Tata Group, Siemens, British Petroleum, Mahindra & Mahindra Group, Larsen & Toubro, Unilever, Marico, Continental Automotive, Castrol, Bajaj Auto, Dempo Group, Johnson & Johnson, Adani Group, BASF, Pfizer, Philips, CIMA, ILO etc.

**➤ Our Contact Details :**

Email: jakhotiya_girish@yahoo.co.in Phone Nos.: (022) 26123059, 26185959, 09867597261
Website: www.jakhotiyaandassociates.com

**Address: 702, Yashwant Apartments, Chittaranjan Road, Vile Parle (E), Mumbai 400057**

# प्रतिष्ठानला पोरके करून मालतीबाई गेल्या!

- विनायक केशव मराठे,(पृ.२०) वरळी-मुंबई

*(आपल्या मराठे कुलवृत्तांताच्या द्वितीय आवृत्ती-१९९१चे संपादक श्री. वि. गो. उर्फ भाऊसाहेब मराठे (पृ.६९)यांच्या पत्नी व प्रतिष्ठान व हितगुजच्या कामामध्ये सर्वतोपरी भाग घेणाऱ्या मालतीबाईंचे प्रदीर्घ आजारानंतर दिनांक २१-१-२०११ रोजी अमेरिकेत निधन झाले. कथा, कादंबऱ्या व बालवाङ्मयाद्वारे साहित्यसेवा आणि दूरदर्शन व आकाशवाणीसाठी विविध प्रकारचे विपुल लेखन करून त्यांनी समकालीन स्त्रीसाहित्यकांमध्ये आपले विशेष स्थान निर्माण केले आहे. आपल्या कुलवृत्तांताचे बाबतीत तर त्यांचे योगदान फारच महत्त्वाचे आहे. ॲपल या कंप्यूटर कंपनीत उच्चपदावर असलेल्या आपल्या मुलाने (माधव)भेट म्हणून दिलेल्या संगणकाचा उपयोग करून त्यासाठी उतारवयात संगणकाचे स्वयंशिक्षण घेऊन त्यांनी कुलवृत्तांताच्या कामी भाऊसाहेबांना अहोरात्र सहाय्य केले व एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास नेला. या निमित्त लोकमान्यनगरमधील त्यांचे निवासस्थान म्हणजे प्रतिष्ठानचे कार्यालयच झाले होते. त्यांच्या या काळात दृढ संपर्कात आलेल्या आपल्या व्ही. के. मराठे यांनी त्यांचे स्मृतिनिमित्त सोबतचा लेख स्वतःची प्रकृती साथ देत नसूनही आग्रहाने मला बोलावून लिहवून घेतला.*
*हे सर्व मराठे परिवाराला व हितगुजच्या वाचकांना प्रेरणादायी ठरेल अशी आशा आहे.- सहसंपादक सी.गो खांबेटे)*

'मालतीबाई गेल्या' ही काहीशी धक्कादायक बातमी श्री.सी गो खांबेटे यांनी ३०जानेवारीच्या सकाळच्या प्रहरी दूरध्वनीवरून मला दिली. मालतीबाई गेली बरीच वर्षे अमेरिकेत स्थायिक झाल्या होत्या. त्यामुळे केवळ फोनद्वारे त्यांचे व भाऊसाहेबांचे त्रोटक संबंध शिल्लक राहिले. भाऊसाहेब व मालतीबाई यांच्या समस्त मित्र-परिवाराने त्यांना अत्यंत चांगल्या आरोग्यावस्थेत अमेरिकेत जाईपर्यंत पाहिले होते. आणि त्यांच्या त्याच प्रतिमा आमच्या मनावर कोरल्या आहेत. म्हणूनच स्वर्गवासी झालेल्या मालतीबाई यांच्या नांवाचे अगोदर 'कै.' हे उपपद लावण्यास मन धजत नाही. म्हणूनच मी 'मालतीबाई गेल्या!' एवढीच प्रतिक्रिया श्री खांबेटे यांचेकडे व्यक्त केली.

भाऊसाहेब आणि मालतीबाई यांनी 'मराठे प्रतिष्ठान' च्या कार्याला सर्वस्वी वाहून घेतले होते. मुलेबाळे परदेशी गेल्यावर साधारणपणे मातापित्यांचे घर ओस पडते. त्यांचा वेळ जाता जात नाही. कोणत्याही लहान मोठ्या पाहुण्याची ही जोडपी आतुरतेने वाट पहात असतात याचे हृद्य लेखन 'संध्याछाया' या नाटकात आपणाला अनुभवाला येते. पण भाऊसाहेब आणि मालतीबाई हे जोडपे याला सर्वस्वी अपवाद होते. कारण त्यांच्या स्नेह-बंधनाच्या कक्षा एवढ्या विस्तृत होत्या की पाहुण्यांची वाट बघण्याचे त्याना कारणच नव्हते. उलट पाहुण्यांच्या वर्दळीने त्यांना अगदी नकोसे झाले असावे असा माझा तर्क आहे. मात्र त्यांनी तसे कधीही दर्शविले नाही हा त्या उभयतांच्या मनाचा मोठेपणाच आहे.आपल्या प्रतिष्ठानच्या संदर्भात बोलायचे तर कार्यकर्त्यांनी त्यांच्या सौजन्याचा पुरेपूर व बऱ्याच वेळा अगदी अतिरेकी फायदा घेतला. भाऊसाहेबांबरोबर कोणत्याही विषयावर बोलणे, चर्चा करणे अथवा प्रतिष्ठानचे काम करणे हा एक सुखद अनुभव होता. म्हणून सेवानिवृत्ती-नंतर दोन घास पोटात घातल्यावर आम्ही अगदी अधाशीपणे त्यांचेकडे धाव घेत असू. जिन्यात आमच्या पावलांचा आवाज ऐकल्यावर (अशी आपली आमची समजूत!) भाऊसाहेब आतूनच ललकारी देत, ''या, या, दार उघडेच आहे.''

असे होते भाऊसाहेबांचे अतिथी प्रेम. पण खरी गंमत तर पुढेच आहे. आल्या आल्याच आम्ही कोचावर बसण्याअगोदरच भाऊसाहेबांचा पहिला प्रश्न-'व्ही.के. तुम्ही गेल्या वेळी काय म्हणत होता?'- मला नेहमीच बुचकळ्यात टाकत असे. कारण गेल्या खेपेला आम्ही कुलबंधूंकडून आलेल्या पत्रांच्या, निरोपांच्या संदर्भात, नवीन पत्ते सापडल्याबाबत, अथवा इतर अनेक गोष्टी बोललेले असू. म्हणून काही तरी उत्तर द्यायचे म्हणून मी म्हणत असे, 'तुम्ही त्या वाराणसीहून आलेल्या पत्राबद्दल म्हणताय ना?' त्यावर डोळ्यावरचा चष्मा टेबलावर ठेवत भाऊसाहेब- 'व्ही. के., मुद्यावर या. ही वाराणसी मध्येच कुठून आणलीत? मी चांगल्या बटाटेवड्यांचे स्वप्न पहात होतो आणि तुमचे नाव पुढे करून ते आजच पुरे होईल या आशेत होतो. पण ही वाराणसी आपल्या आड आली' हा आमचा सुखसंवाद चालू असताना मालतीबाई स्वयंपाकघरातून हॉलमध्ये येण्याच्या दरवाज्यात उभ्या आहेत हे आमच्या लक्षातच येत नसे.''अहो, एवढ्याशा गोष्टीसाठी व्ही. के.ना कशालामधे आणता? त्याना बटाटेवडे आवडतात हे तुम्ही काल बोलला होतात. त्यांचे पोट जरा रिकामे होऊ द्या. मग दुपारी आपण हात मारू''.

मालतीबाईनी केलेला हा गौप्यस्फोट बाजूला सारत भाऊसाहेब म्हणत, ''अहो, बटाटेवडे दुपारी. आत्ताचे काय? दुपारपर्यंत काय आम्ही पाणी पीतच काम करायचे काय? काय, व्ही के, बरोबर ना?'' मी काय बोलणार. दोघांकडे आळीपाळीने बघत मी गप्प बसत असे. त्यावर मालतीबाई म्हणत-''त्याचीही व्यवस्था झाली आहे. आज चहा नाही. कालच कोकमं आली आहेत. त्याचे सरबत तयार आहे. बरोबर नेहमी प्रमाणे फरसाणाची बशी तयार आहे. तेव्हा तुमचे काम सुरू होऊ द्या.'' प्रतिष्ठानच्या कामाला अशा रितीने खाण्यापिण्याने सुरुवात होऊन त्याचा शेवट संध्याकाळी, कधी कधी तर रात्रीदेखील, फलाहाराने होत असे!

हे वर्णन फक्त एका दिवसाचे नाही, तर काही वर्षांचे आहे. भाऊसाहेबांनी १७ हजारावर पत्रे स्वहस्ते अत्यंत सुरेख अक्षरात लिहिली. आम्ही काम करताना असंख्य नोंदी तपासून पाहिल्या. अनेक वेळा दुरुस्त्या केल्या. विशेषतः परिशिष्टे बनवतांना मा.ना.मराठे व भाऊसाहेब यांनी

जबरदस्त मेहनत घेतली. कारण मी निवृत्तीनंतर एक खाजगी नोकरी पत्करल्यामुळे मला दिवसभर काम करता येत नव्हते. आमचे मुखपत्र त्याकाळी अगदीच प्राथमिक अवस्थेत होते. भाऊसाहेब स्वतःच ते लिहीत असत व त्यानंतर सुरेशभाऊंच्या छापखान्यात त्याची मुद्रणप्रत तयार होत असे.

एकदा कार्यकारिणीच्या सभेत भाऊसाहेब म्हणाले, ''व्ही. के., हे मुखपत्र, मुखपत्र मला 'मुखशुद्धी' सारखे वाटते. काही चांगले नांव शोधा''. त्यावर मी-'' भाऊसाहेब, नांव शोधायला हरकत नाही. पण तुम्हाला संस्कृतप्रचुर भाषेत हवे का सहज समजेल असे सोपे हवे ?''

''व्ही.के.,तुम्ही गोपाळ म्हणा कि गोविंद म्हणा, कोणते तरी नांव द्या. आपण लगेच त्याचा नामकरण सोहाळा येथेच उरकू''.

मी थोडावेळ विचार करून म्हटले, ''भाऊ-साहेब, तुम्हाला 'हितगुज' हे नांव कसे वाटते ?'' यावर भाऊसाहेबांच्या ऐवजी सुरेश भाऊनीच- 'हे तर अगदी समर्पक आहे. चला आत्ताच आपण हे नांव पक्के करूया'-असे म्हणून शिक्कामोर्तब केले. मी प्रतिष्ठानमध्ये येण्याचे अगोदर भाऊसाहेब आणि मालतीबाईच मुखपत्राचे सर्व काम करीत असत. म्हणून त्यांची संमती घ्यावी असे मी सुचविले. भाऊसाहेबांनी लगेच टेबलावरील फोन घरी लावून मालतीबाईना सांगितले .तेंव्हा त्यांनी संमती लगेच दिलीच आणि वर त्या म्हणाल्या,

''उद्या आपल्याकडे व्ही. के. येतील तेव्हा त्यांना म्हणा,जेवून येऊ नका. नाही तर अजीर्ण होईल''. या अशा आपल्या मालतीबाई. प्रतिष्ठानच्या प्रत्येक कामात त्यानी स्वतःला झोकून दिले होते. 'वधूवर सूचक मंडळाचे काम करावे का' हा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्यांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया लक्षणीय होती.

''सुखवस्तू घरातील सुशिक्षित मुलींच्या विवाहाला मदत करण्याच्या ऐवजी आपण सामान्य कुटुंबातील सामान्य मुलींच्या विवाहाला मदत करून त्यांचे संसार उभारून दिले तर ते प्रतिष्ठानच्या उद्देशाला धरून होईल.'' - अशी होती मालती-बाईंची सामाजिक जाणीव.

हितगुज मध्ये मालतीबाईनी बरेच साह्य केले. प्रुफे तपासणे, मुद्रणप्रत तयार करणे, लिखाणातील व्याकरण पहाणे, वगैरे कामे त्या हौशीने करीत. एवढेच नव्हे तर सुरुवातीला आम्ही हितगुजच्या अंकांना वेष्टने घालून, त्यावर नांव पत्ते लिहून, ते गठ्ठे पोष्टात नेऊन देत असू. या कामी सुद्धा त्यांची खूप मदत होत असे. खरे म्हणजे मी व भाऊसाहेब अंकांची गाठोडी पोष्टात घेऊन जाण्याचे कामच प्रामुख्याने करीत असू.

यावरून एक गमतीची गोष्ट आठवते. मालती-बाईनी 'माळ्यावरील अडगळ' हा लेख हितगुजमध्ये छापण्या अगोदर माझ्या हाती दिला. मी तो वाचला. त्यांचे हे लिखाण कथा, स्मरणरेखन आणि लघु-निबंध यांच्या सीमेवर फेरफटका मारणारे होते. तेव्हा कोणत्या साहित्य प्रकारात हे मोडते हे सांगणे कठीण होते. मी हे म्हटल्यावर भाऊसाहेब हसून म्हणतात, 'अडगळच ती. इतके दिवस माळ्यावर होती, आता ती तुमच्या हितगुजमध्ये ठेवली, इतकेच! कसली कथा नि कसला निबंध ?''

हा शेरा ऐकून मालतीबाई रागावून मला म्हणाल्या,''व्ही. के., तुम्ही संपादक म्हणून नाव घालत असाल तरच मी यापुढे माझे लिखाण देईन''. अर्थात मी माझे नाव संपादक म्हणून घातले नाही तरी सुद्धा मालतीबाईंची साहित्यिक मदत चालूच होती.

असे कितीतरी किस्से मालतीबाई आणि भाऊ-साहेब यांच्या लाघवी स्वभावाचे सांगता येतील. थोडक्यात, मालतीबाई या प्रतिष्ठानला मातृस्थानी होत्या. त्यांनी प्रतिष्ठानच्या कार्यावर व कार्यकर्त्यां-वर अलोट प्रेम केले. त्यांच्या साहित्यिक मित्र-मैत्रिणींकडे ते आमच्या छोट्याशा हितगुजची प्रशंसा करीत. एकदा तर त्या मला म्हणाल्या, ''किर्लोस्कर समूहाने 'किर्लोस्कर खबर' अशी छोट्या उपक्रमाने सुरुवात करून किर्लोस्कर, स्त्री, व मनोहर अशी दर्जेदार मासिके निर्माण केली. आपल्या प्रतिष्ठानचा विस्तार झाल्यावर आपले हितगुजसुद्धा अगदी प्रोफेशनल दर्जाचे त्रैमासिकच नव्हे मासिक स्वरूपात देखील आणता येईल.''

खांबेट्यांचा फोनवरून निरोप आल्यावर या सर्व आठवणी माझ्यापुढे फेर धरू लागल्या आणि मनात असा विचार आला की मालतीबाईना खरीखुरी श्रद्धांजली वाहायची असेल तर हितगुजचे कार्य वृद्धिंगत करून मालतीबाईंच्या इच्छेप्रमाणे ते सर्व सामान्य मराठी माणसाला आवडेल अशा मासिक स्वरूपात त्याची परिणती करण्यासाठी प्रतिष्ठानच्या कुलबांधवाना झटावे लागेल.

**- विनायक केशव मराठे, (पृ.२०)**
वरळी-मुंबई, दूरध्वनी ०२२-२४३०३३२९

## सहवेदना

मौजे, कळंबुशी, ता. संगमेश्वरचे ग्रामस्थ, सध्या वैशालीनगर, दहिसर, मुंबई येथील रहिवासी, निवृत्त महाराष्ट्रशासन व मुंबई पोलीस सुवर्ण प्रशस्ती पत्रकधारक. ज्येष्ठ समाजसेवक, मराठे प्रतिष्ठानचे सक्रिय सभासद श्री. सुरेशराव मराठे यांच्या पत्नी कै. सौ. वंदना सुरेश मराठे (पृ.३६५) पूर्वाश्रमीच्या मालती विश्वनाथ चितळे, चिपळूण यांचे दिनांक २४-११-२०११ रोजी सकाळी १०वाजून ४० मिनिटांनी दुःखद निधन झाले. तसेच सुरेशराव मराठे यांच्या मोठ्या भगिनी, मराठे प्रतिष्ठानच्या सदस्या श्रीमती शोभा मोरेश्वर सावरकर (पृ.३६५) पूर्वाश्रमीच्या कमल भिकाजी मराठे यांचे दिनांक १९ जानेवारी २०११ रोजी सायंकाळी ५वाजता हृदय विकाराच्या पहिल्याच झटक्याने निधन झाले. दोन्ही कुटुंबाचा भाऊ-बहीण, मुली-जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. वंदना सुरेशराव मराठे तसेच श्रीमती शोभा मोरेश्वर सावरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली. या शोकाकुल परिवारात मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे.

**वैकुंठवासी ती. पिताश्री दामोदर हरि मराठे यांच्या पवित्र, प्रेमळ स्मृतीस अभिवादन**
श्री. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

# कुलवृत्तांत : बदलते संदर्भ

- श्रीनिवास अ मराठे (पृ.३१२)

गेली काही वर्षे सुरू केलेल्या कुलवृत्तांताच्या सुधारित आवृत्ती २०११ च्या प्रकल्पासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन व याकामी आमूलाग्र नव्याने ऑन लाईन डाटाबेस पद्धतीचा वापर करून अधिकाधिक संगणकसाक्षर परिवार सदस्यांच्या सक्रिय सहकार्याची अपेक्षा घेऊन नवी दिशा देण्याचा हा एक प्रयत्न आपणाला निश्चितच आवडेल. यासाठी या मधील आवाहनाला आपल्या प्रतिसादाची,आम्ही वाट पहात आहोत. यासाठी आपण आपला पत्ता, फोन क्रमांक व आपल्या वडिलांचे पूर्ण नाव आम्हाला कळवावे म्हणजे आपले कुलवृत्तांतातले स्थान निश्चित करून आपली माहिती नोंदवून घेता येईल.

सहसंपादक-सी.गो.खांबेटे

भूतकाळातील काही असामान्य व्यक्तींच्या कार्याची नोंद म्हणजे इतिहास! शाळेत असताना परीक्षा संपताच पुढील वर्षाचं इतिहासाचं पुस्तक आनंदानं व कुतुहलानं वाचणारा मी तेच पुस्तक परीक्षेचा अभ्यास म्हणून वाचण्यास नाखूष असायचो. शिक्षक म्हणायचे की इतिहास अभ्यासला पाहिजे कारण तेव्हा केलेल्या चुका टाळता येतात. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. ही दोन वरकरणी विरोधाभास दर्शवणारी वाक्यं तेव्हा खटकली. पण या विषयावर शिक्षकांशी वाद घालण्याची कुवत जरी तेव्हाही होती तरी हिम्मत मात्र नव्हती. शिक्षकांचा मान राखण्याचे संस्कार होतेच पण ज्यांचा मान राखावा असे शिक्षकही होते. काळानुरूप परिस्थिती बदलत असते. बदलत्या परिस्थितीनुसार आपला इतिहासाकडे पहाण्याचा दृष्टिकोनही बदलावा लागतो. बैलांच्या शिंगांना मशाली लावून मोगल सैन्याची दिशाभूल करण्याचा शिवाजीमहाराजांचा गनिमीकावा आजच्या भारत–पाक युद्धात उपयोगी पडला नाही तरी बदलत्या परिस्थितीत तशीच क्लुप्ती लढवण्यासाठी इतिहासाचा अभ्यास महत्वाचा!

आज इतक्या वर्षांनी याची आठवण झाली याला कारण माझ्या वडीलांची डायरी. तसं पाहिलं तर इतिहासकालीन बखर व डायरीत फरक एवढाच की बखरीतल्या नोंदी हा इतिहास असतो तर डायरीतल्या नोंदी हा काही काळानंतर इतिहास होणार असतो. या डायरीच्या वाचनामुळे काही घटनांच्यामागे असलेले सत्य समजले आणि कुटुंबियांविषयी काही उपयुक्त माहिती मिळाली. आपल्या चुलत किंवा आते–मामे भावंडांच्या शैक्षणिक किंवा व्यावसायिक पार्श्वभूमीची माहिती आपल्यापैकी किती जणांना असेल? फक्त घरच्याच नव्हे तर इतर कुटुम्बीय, आप्त व मित्रमंडळींच्या जीवनातील विशेष प्रसंगाच्या तपशीलवार नोंदी वडिलांनी करुन ठेवल्या असल्याने त्यांचं वाचन एक वेगळाच पण अविस्मरणीय अनुभव देऊन गेलं. आपण इतर कुटुंबियांशी कसे संबंध ठेवावयास हवे याच्या झालेल्या जाणीवेतून मग सर्व कुटुम्बीय, मित्रमैत्रिणी व व्यवसायाशी संबंधित सहकाऱ्यांच्या तपशीलवार माहितीच्या नोंदी मी माझ्या संगणकावर केल्या. संगणकात किंवा सेलफोनवर नोंद केल्यावर आपल्याला आठवण ठेवायला लागत नाही. त्यामुळे, त्यांच्या जन्मदिनी वा विवाह वर्षदिनी त्यांच्याशी प्रत्यक्ष नाही तरी संभाषणातून संपर्क साधता आला याचा त्यांना व मलाही खूप आनंद झाला. मग मनात एक विचार आला. हेच आपल्याला आपल्या मोठ्या कुटुंबासाठी ( मराठे कुलबांधव) ही करता येईल. मराठे वा इतर कोणत्याही चित्तपावनांच्या अलिखित डायऱ्या म्हणजे त्यांचे कुलवृत्तान्त. कुलवृत्तांत ही खास चित्तपावनी संकल्पना. इतर युरोपियन देशांमधे फ़ॅमिली ट्री चं महत्व आता कुठे पटू लागलं आहे. पण एकदा ते पटल्यावर त्यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलं आहे

मग कुलवृत्तांत म्हणजे नेमकं काय? बऱ्याचं जणांनी यावर खूप चर्चा करुन उलटसुलट मतं मांडली आहेत. परंपरागत कल्पनेप्रमाणे आपल्या पुर्वीच्या ज्ञात पिढ्यांच्या महितीचं संकलन म्हणजे कुलवृत्तांत. यामुळे त्यांच्या कार्याची माहिती तर होतेच पण घेणाऱ्याला त्यापासून बोधही घेता येतो. म्हणजे ज्ञान व प्रबोधन ही दोनही उद्दीष्टं कुलवृत्तांत साधतो. आपल्याला पद्मभूषण, पद्म–विभूषण किंवा भारतरत्नचा सन्मान मिळावा ही कोणाही प्रसिध्द खेळाडू, राजकारणी, सिनेअभिनेत्याची मनीषा असू शकते. मग या पद्मपुरस्कारांसाठी आपली वर्णी लावून घेण्यासाठीची त्यांची धडपड बघून ही मनीषा की लालसा असा प्रश्न पडतो. मग तुलनेत सामान्य असणाऱ्या आपल्यासारख्या माणसाला त्याच्या अगदी छोट्यात छोट्या यशाचं कौतुक व्हावसं वाटलं तर त्यात वावगं काय? कधीकधी जगाच्या दृष्टिनं हे यश मोठं नसेलही पण आपल्या जवळच्या म्हणवणाऱ्यांना मात्र त्याचं अप्रुप वाटतं किंबहूना वाटावं. आपलं नाव वर्तमानपत्रांत झळकावं किंवा येनकेन प्रकारेण प्रसिध्दो पुरुषो भवेत असं वाटणाऱ्या प्रत्येकाची ही इच्छा पुरी करण्याची संधी कुलवृत्तांत त्यांना देतो.

एकमेकांशी संवाद साधण्याची पहिली पायरी म्हणजे परस्परांची नीट ओळख. ओळख जर घट्ट झाली तर एकजूट होण्यास वेळ लागत नाही. एका मुस्लिम दोस्ता बरोबर चर्चा करतांना त्यांच्या कट्टरतेचं वा एकीचं रहस्य उलगडलं. तो म्हणाला नमाज पढतांना आम्ही एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे असतो. त्यामुळे एकटेपणाची भावना दूरान्वयानंही होत नाही. आजच्या या आरक्षण आणि कोटा च्या सद्य-स्थितीत एकोपा महत्वाचा! आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणं व विविध सरकारी खाती व संस्थांमधे आपली दाद लावून घेणं हे संघटनेच्या बळावर जलद साध्य होऊ शकेल. संघटनेचं बळ आपल्याला बारगेनींग पॉवर देईल आणि हे बळ मिळवता येईल एकमेकांना नीट जाणून घेतलं तर. नुकताच अर्थ-संकल्प मांडला गेला. ज्यांचे दबावगट (लॉबीज) मजबूत आहेत त्या सर्वांच्या पदरात काही ना काही पडलं पण सामान्य माणसाच्या झोळीत बहुधा काहीच पडत नाही हा आजवरचा अनुभव. मग अर्थसंकल्प कोणाच्या हिताची जपणूक करतो? आपली दखल घेतली जाणं हे यासाठीच महत्वाचं आहे आणि म्हणूनचं एकीचं बळ महत्वाचं.

आपला मराठे कुलवृत्तांत १९९०-१९९१ च्या सुमारास प्रसिद्ध झाला. बहुतेक कुलबांधवांची १९८८ पर्यन्तची माहिती त्यात संकलित झाली आहे. १९९१ च्या सुमारास भारतात जागतिकी-करणाचे (ग्लोबलायझेशनचे) वारे वाहू लागले होते. गेल्या दोन दशकांत भारताने सर्वच, विषेशतः माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे आणि या क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. नव्या पिढ्यांसमोर जसे नवीन तंत्रज्ञान नवी आव्हाने उभी करीत आहे तसेच ते त्यांना प्रगतीच्या नव्या दिशा दर्शवीत आहे. ही नवी पिढी या मायाजालात गुरफटून गेली आहे. दिवसाचे ८/१० तास ही मुलं कॉम्प्यूटरवर चॅट किंवा सेलफोनवर संभाषण करीत असतात. याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे त्यांचा इतर कुटुंबियांशी असलेला संवाद तुटत चालला आहे. कुटुंबाशी, समाजाशी आणि भूतकाळाशी असलेली त्यांची नाळंच तुटत चालली आहे. आपल्या पूर्वजांनी कशा परिस्थितीत दिवस काढले आणि आपल्याला काय वारसा दिला याची जाणीव या मुलांना होऊ शकत नाही. त्यांना खरोखरंच इतकी व्यवधानं आहेत की त्यांना या वरकरणी निरुपयोगी माहितीची गरज वाटत नाही. आपण समाजाला तर सोडाच पण स्वतःच्या कुटुंबालाही काही देणं लागतो ही भावना त्यांच्या मनात निर्माण होणं जितकं गरजेचं आहे तितकंच गरजेचं अहे ही तुटलेली नाळ परत जोडणं. सन्माननीय अपवाद वगळता, आपल्या आईवडिलां पलिकडे आजोबांच्या पुढे त्यांच्या ज्ञानाची मजल जात नाही. बरीचं वर्षं शहरांत राहिल्यामुळं आपलं मूळंच विसरलेली यांची व आमचीही पिढी यातून जात आहे. आपल्या आणि आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाची नोंद करून ठेवणं किती महत्वाचं आहे हे या पिढीच्या मनावर बिंबवण्याची हीच वेळ आहे.

या महितीच्या युगात आपण, जे कुलवृत्तांताचे प्रवर्तक आहोत, त्यांनी मागे राहून चालणारंच नाही. याच भावनेनं व पुढील संगणकप्रिय पिढीला मार्गदर्शक ठरेल या उद्देशानं श्री. सी. गो. खांबेटे व इतर समविचारी कुलबांधवानी कुलवृत्तांत प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर अथक, अविश्रांत व अमोल अशा परिश्रमांती उपलब्ध केला. यासाठी त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. त्यांनी हे जाणलं की यामुळेच ही नवी पिढी ही माहिती जाणून घेण्यास उत्सुक होईल. सध्या कुलवृत्तांत आपण प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर पुस्तक स्वरूपात ( पीडीएफ़ फ़ाईल ) उपलब्ध आहे. म्हणजे माहिती उपलब्ध आहे. पण महितीची उपलब्धता (इन्फ़र्मेशन स्टोरेज) आणि उपलब्ध महितीमधून इच्छित माहितीचं संकलन (इन्फ़र्मेशन एक्सट्रॅक्शन) या दोन भिन्न गोष्टी आहेत. आजच्या तरुणांना एखादी गोष्ट जर ताटात वाढून मिळाली तर हवी असते म्हणजेच हवी ती माहिति एक बटण दाबताच मिळाली तर हवी असते. त्यामुळे हीच माहिति जर डेटाबेस या स्वरुपात असेल तर आजची संगणकप्रेमी तरुणाई त्या माहितीचा अधिक परिणामकारक उपयोग आनंदाने करेल. आता या स्वरुपात ती परिवर्तीत करण्यात वेळ व पैसा यांचा अपव्यय होईल. घरटी एक संगणक जाणकार मराठे कुटुंबात नक्की असेल ही खात्री आहे. त्यामुळे इंटरॲक्टिव पध्दतीनं ही माहिती कुलबांधवांनीच संकेत-स्थळावर जाऊन पुरवल्यास हे जिकीरीचे काम अत्यंत कमी वेळात होऊन जाईल. मला खात्री आहे की १९४१ साली विष्णू विनायक परांजपे व चिंतामणी शंकर दातार या द्वयीने भारतभर फिरून कुलबंधवांची माहिती जमवण्याच्या केलेल्या खटाटोपापेक्षा हे जरा सुकरच होईल. हा उपक्रम कुलोपयोगी असल्यानं प्रत्येकजण यात सहभागी होऊन आपला खारीचा वाटा उचलेल याची खात्री आहे.

या माहितीचे संकलन करण्याची प्रणाली (सॉफ़्ट्वेअर) तयार करण्यास उत्सुक असणाऱ्या कुलबांधवांनी श्री सी.गो.खांबेटे यांच्याशी किंवा माझ्याशी इंटरनेटद्वारे वा फ़ेसबुक वर लवकरात लवकर संपर्क साधवा. ही माहिती ३ टप्प्यांत संकलित करावी लागेल. पहिल्या टप्प्यात बांधव आपलं, पिता व आजोबांचं नाव, पत्ता, फ़ोन, सेल नंबर, ईमेल आयडी इत्यादी किमान माहिती देईल. या तीन नावांवरुन त्याचे घराणे व पिढी नक्की केल्यावर (व्हॅलिडेशन) त्याला एक आयडी देण्यात येईल. हा आयडी वापरून पुढील २ टप्प्यातील माहिती त्याने संकेतस्थावर पुरवावी असे या उपक्रमाचे स्वरुप आहे. याप्रकारे एकदा कुलवृत्तांत संकेतस्थळावर आल्यावर त्यातून विविध प्रकारची माहिती संकलित करता येईल उदाः एखाद्याचा वंशवृक्ष, पूर्वज, वारस, समवयीन, समकालीन,

त्याच शहरात असणारे, इत्यादी कितीतरी वेगवेगळ्या क्वेरीज शक्य आहेत.

या सर्व प्रकल्पासाठी आपल्या सर्वांचंच योगदान अपेक्षित आहे आणि या बाबतीत आपल्या सूचना व मार्गदर्शनाचं स्वागतंच आहे. तेव्हा श्री खांबेटेंच्या आजपर्यंतच्या अमोल परिश्रमांना जोड देऊन त्यांच्यावरचा भार हलका करु या! त्यांचं मोलाचं साह्य लाभेलच आणि आशिर्वाद सदैव मार्गदर्शक असतील.

**श्रीनिवास मराठे (पृ.३९२)**
९८३३२१६४६८,
०२२-२४४५८६२१
shriniwas_marathe@yahoo.com

**सी. गो. खांबेटे (पृ.६७६)**
९८३३५६४२६८,
०२२-२६८३६९९४
sitaram.khambete@gmail.com

## आरोग्यासाठी काही उपयुक्त माहिती

**फॅटस् : कोणते व किती?**

१. फॅटस हे फॅटी ॲसिड्सने बनलेले असतात. रोज १४ ग्रॅम फॅट हे मानवी शरीराची फॅटी ॲसिडची गरज पूर्ण करायला पुरेसे आहे. बहुतेक अमेरिकन व सुखवस्तू भारतीय सरासरी रोज ६०-९० ग्रॅम फॅटस् खातात. म्हणजे ते आपल्या एकूण कॅलरीजच्या २५-३५% कॅलरीज फॅटमधून घेतात. यामुळे वजन वाढतं व कोलेस्टिरॉल वाढतं. सर्वसामान्य निरोगी माणसाने (ज्यांना हृदयरोग नाही, व कोलिस्टिरॉल १५- कि.ग्रॅ पेक्षा कमी आहे.) फॅटमधून मिळणाऱ्या कॅलरीज या आहारातील एकूण कॅलरीजच्या २०% च्या आत ठेवाव्या म्हणजे मध्यमवर्गीय निरोगी माणसाने आहारातील फॅट रोज ४० ग्रॅमच्या मर्यादेत ठेवावे.

ऑर्निशच्या उपचार पद्धतीनुसार हृदयरोग उपचारासाठी किंवा कोलेस्टिरॉल कमी करण्यासाठी ज्यांना प्रयत्न करायचा आहे त्यांनी आहारातील फक्त १०% कॅलरीज फॅटमधून घ्याव्या म्हणजे रोज जवळपास २५ ग्रॅम फॅट घ्यावे. काही फॅट हे अदृश्य फॅट, म्हणजे इतर अन्नघटकात निसर्गत: असते. म्हणून रोज २० ग्रॅम किंवा ४ चहाचे चमचे तेल वरून स्वयंपाकात वापरावे.

२. किती फॅट खावे यासोबतच कोणत्या प्रकारचे फॅट खावे, हेही अत्यंत महत्त्वाचे आहे. फॅटचे प्रकार :

| | | |
|---|---|---|
| अ. सच्युरेटेड | : | दूध, लोणी, तूप, मटण, अंडी, नारळ तेल. शिवाय थोड्या प्रमाणात इतर सर्व तेलात |
| आ. मोनो अनसच्युरेटेड | : | शेंगदाणा किंवा तिळाचे तेल, मोहरी (सरसो) तेल, मासे यात अधिक प्रमाणात |
| इ. पॉली-अनसच्युरेटेड | : | सफोला, सनफ्लावर तेल, सोयाबीन तेल यात अधिक प्रमाणात |
| ओमेगा ६ | : | वजन वाढवतात, प्रतिकारशक्ती कमी करतात. हृदयरोग व कॅन्सर वाढू शकतो. 'सफोला' तेलामध्ये हे फार जास्त आहेत. |
| ओमेगा ३ | : | हृदयासाठी चांगले. मोहरी तेल (किंवा सरसो किंवा कॅनोला तेल)<br>मासोळी (पण यात सच्युरेटेड फॅट देखील आहे.)<br>कडधान्ये (सालीसहित), बीन्स (उदा. राजमा)<br>हिरव्या भाज्या, सोयाबीन |

ओमेगा ६ व ओमेगा ३ यांचे प्रमाण ५:१ ठेवावे.

**- प्रेषक : श्री. वा. ग. मराठे, पुणे (पृ. ५०३)**

## निबंध स्पर्धा

### विषय : आदर्श होळीची संकल्पना

शब्द मर्यादा : ५०० शब्द, वयाची अट नाही. निबंध पाठविण्याची अंतिम मुदत २५मे २०११

हितगुज संपादिकेच्या, ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई - ४०००३१ या पत्त्यावर निबंध पाठवावेत. परीक्षकाचा निर्णय अंतिम राहील. हितगुज जून २०११ च्या अंकात विजयी स्पर्धकांची नावे घोषित केली जातील. बक्षीसपात्र निबंध 'हितगुज' मधून प्रकाशित केला जाईल.

पहिला नंबर २००रु. दुसरा नंबर १००रु. पारितोषिक दिले जाईल.

श्री. शरच्चंद्र के. मराठे, भंडारा हितगुज जून, २०१० अंक ८२वा पृ. १३वर 'वाचकांचा पत्रव्यवहार'मध्ये 'आदर्श होळीच संकल्पना' यावर ५० ओळींचे लेख मागवून स्पर्धा घ्यावी असे कळविले होते त्याचा विचार करून 'होळी रे होळी' हा लेख लिहिणारे श्री. अ. द. मराठे यांनी प्रत्येकी २००रु आणि १००रु. ची बक्षिसे देण्याचे ठरविले आहे तरी निबंधस्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घ्यावा ही विनंती.

- संपादिका

## सहवेदना



श्री. सदाशिव बळवंत मराठे यांची धर्मपत्नी सौ. सुधा सदाशिव मराठे (पृ.क्र.३८०) यांचे वयाच्या ७७व्या वर्षी १२ जानेवारी २०११, बुधवार रोजी निधन झाले. गेली अनेक वर्षे सतत योगासने व प्राणायाम नियमित करून मधुमेहाला २३ वर्षांपासून इन्स्शुलिन न घेण्याच्या निर्धाराने टक्कर दिली. १९५५साली कोल्हापूरच्या 'जोशीराव' कुटुंबातून लग्न करून 'मराठे' घराण्यात आल्या. तीन मुले, एक मुलगी, पाच नातवंडे, सुना, जावई ह्यांचा निरोप घेऊन एक यशस्वी व कर्तव्यदक्ष गृहिणी म्हणून कुटुंबात व मित्रमंडळीमध्येही आदरास प्राप्त झाल्या. सर्व आप्तस्वकियांना त्यांची अनुपस्थिती खूप कष्टाने विसरायचा प्रयत्न करावा लागेल. ईश्वरेच्छा बलीयसी!

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधा सदाशिव मराठे यांना विनम्र श्रद्धांजली! शोकाकुल कुटुंबात मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे.

## सहवेदना



श्रीमती निर्मला रामचंद्र मराठे (वय ८०) यांचे दिनांक २३-१२-२०१० रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या, तरीही आधुनिक विचारांचे स्वागत करून ते कृतीतही आणत असत. त्या स्वभावाने अतिशय शांत प्रवृत्तीच्या होत्या. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना. मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमांना त्यांची आवर्जून हजेरी असे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्रीमती निर्मला रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## सहवेदना



कोथरूड येथील माजी सैनिक विष्णू रामचंद्र (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने दिनांक १६ जानेवारी २०११ला निधन झाले. त्यांच्यामागे बहीण, पत्नी, २ मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

कोथरूड विभागात ते पूर्वी 'हितगुज'चे अंक वाटत असत.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. विष्णू रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## सहवेदना



श्री. विनायक ऊर्फ मोहन पुरुषोत्तम चक्रदेव. (पृ. ३५२) वय वर्षे ७४ यांचे गुरुवार दिनांक १६ डिसेंबर २०१० रोजी आकस्मिक निधन झाले. एअर इंडियामध्ये प्लॅनिंग ऑफिसर म्हणून सेवा केली. नेहमी हसतमुख सर्वांना सहकार्य करण्याची वृत्ती, अन्यायाची चीड यावरून व इतर सामाजिक प्रश्नांवर वर्तमानपत्रातून कायम मार्मिक लेखन करीत. शेवटचे लेखन दूरदर्शनवरील संस्कारशून्य मालिका व त्यांचे लेखन यावर सोमवार १३-१२-२०१०ला प्रसिद्ध झाले.

संगीताची आवड, आवाज सुंदर त्यामुळे गायनाने सर्वांना जिंकत. संगीत, नाट्य व वक्तृत्व उत्तम यामुळे या स्पर्धातील प्रथम क्रमांकाची बक्षीसे कायम मिळवली. प्रवासाची आवड. एअरइंडियामुळे तो भरपूर केला. अत्यंत हौशी व दिलदार असल्याने कोणाशीही त्यांचे जमत असे.

श्रीदत्तावर अत्यंत श्रद्धा असल्याने त्यांची एक खास दत्ताची आरती सर्वांकडे झाली. ३५वर्षे कंपनीतही दर गुरुवारी प्रथम आरती मग काम चाले. अत्यंत प्रामाणिकपणामुळे सगळ्यांच्या गळ्यातला ताईत अशी ख्याती होती. उत्तम प्रशासक, उत्तम कार्यकर्ता, उत्तम ऑफिसर म्हणून गौरव झाला.

हसत-खेळत, चेष्टामस्करी, नकला करीत सर्वांना चटका लावून कोणताही आजार नसताना झटकन इहलोकीचा निरोप घेतला हे सर्वांनाच जिव्हारी लागेल. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी आशा, पुत्र चि. आशिष, स्नुषा सौ. अनुजा व नातू चि. अर्जुन आहेत.

साश्रूनयनांनी वाहिलेली ही श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो!

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. विनायक उर्फ मोहन पुरुषोत्तम चक्रदेव यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# संगीत साधक-प्रसारक मराठे

**सौ. वर्षा नंदलाल गोडबोले (पृ.१२८)**

**संगीत प्रविण**

अशी आमच्या दारावरची पाटी वाचून माझी मैत्रीण मला म्हणाली अय्या प्रभा, तुझे वडील संगीत प्रविण आहेत? तेव्हा मी तिला सांगितले की ते गांधर्व महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल आहेत. तेव्हा तर ती एकदम आश्चर्यचकितच झाली. तेव्हा आम्ही शाळेत होतो आणि ते पण त्याच शाळेत पार्टटाईम संगीत शिक्षक म्हणून काम करत. त्यामुळे तिने त्यांना पाहिले होते. तिचा त्यांच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढला. अतिशय साधी राहणी, मितभाषी, शांत स्वभावाचे आमचे अण्णा पण विद्यालयात सर्वांना त्यांचा आदरयुक्त धाक वाटे.

त्यांचे संपूर्ण नाव धुंडीराज गोविंद मराठे. २० डिसेंबर, १९२० रोजी वाई येथे त्यांचा जन्म झाला आणि १९२२ साली त्यांच्या बहिणीचे श्री. विनायकराव पटवर्धन यांच्याशी लग्न झाले. पुढे मराठे मंडळी वाई सोडून पुण्यात आली. खरं तर अण्णांचे वडील होमिओपॅथीचे अभ्यासक आणि देवी डॉक्टर. परंतु पंडित विनायकरावांकडून संगीताचे बाळकडू मिळाले आणि मराठ्यांकडे संगीताची परंपरा आली. गुरुंच्या कडक तालमीत तयार झालेले अण्णा त्यामुळेच शिस्तप्रिय, स्वावलंबी, सदाचारी, निर्व्यसनी असे तयार झाले. गुरुंनी शिकवलेल्या विद्यार्थ्यांकडून परत रियाज करून घेणे हे काम सुरुवातीला त्यांनी अतिशय मनापासून केले, त्यामुळे त्यांना तालीम मास्तर असेही म्हणत.

संगीत क्षेत्रात त्यांची शिकवण्याची किंवा परीक्षा घेण्याची पद्धत फार छान होती. कुठल्याही विद्यार्थ्याला त्यांनी कधी नाउमेद केले नाही. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर गाणी म्हणजे सुगम संगीत, नाट्यसंगीत, सिनेसंगीत, भजने इ. प्रकारातील गाणी ते ऐकून स्वत: बसवत आणि विद्यार्थ्यांना शिकवत. नोटेशनसकट आपल्या वहीत तारीख-वार घालून लिहून ठेवत.

गाण्याच्या बरोबरीने तबला, हार्मोनियम, बासरी, सतार, व्हायोलिन, जलतरंग इत्यादी वाद्यांचा त्यांचा अभ्यास होता. प्रविणपर्यंतच्या अभ्यासक्रमातच ह्या सर्व गोष्टी त्यांना शिकवत.

सकाळी ६ वाजताच त्यांचा संगीताचा दिवस सुरू होई ते रात्री १० वाजता शेवटची ट्यूशन घेऊन संपे. दुपारच्या जेवणानंतर मात्र अर्धातास विश्रांती हा नियम ठरलेला.

कुठल्याही व्यसनात ते कधी गुंतले नाहीत. नाही कधी चहा घेतला तर नाही कधी सुपारी खाल्ली. मग बाकीचे तर दूरच!

एक दिवस अण्णांना मी म्हटले, काल मला एक खूप छान भैरवी शिकायला मिळाली. तेव्हा त्यांनी ती ऐकली. म्हणाले, मधले जे कडवे आहे त्याचा अर्थ फारच छान आहे. तर त्याचे शब्द होते - ''मन:शांती जर हवी तुम्हाला, दोष न द्यावा कधी कुणाला.'' मी घरी आल्यावर ह्यांना (श्री. गोडबोले) सांगितले की अण्णांना भैरवीचे मधले कडवे खूप अर्थपूर्ण, छान वाटले. तेव्हा हे लगेच म्हणाले अगं, तुमचे अण्णा तर स्वत:च तसे जीवन जगतायत.

तर असे आमचे अण्णा शांत, समाधानी! शांत ह्या शब्दावरून एक आठवण झाली. आम्ही ज्या वाड्यात राहायचो तिथे घराला घरे अगदी लागून होती. एक दिवस शेजारच्या बाई गप्पांच्या ओघात म्हणाल्या, ''१२ वर्षे झाली मी तुमच्या शेजारी राहतेय पण तुमच्या अण्णांचा चढलेला आवाज तर कधी ऐकला नाहीच, पण त्यांच्या बोलण्याचा आवाज पण कधीच ऐकला नाही. घरातसुद्धा ते अतिशय कमी आणि हळू बोलत.

एकदा प्रसिद्ध गायक श्री. आनंद भाटे यांचे वडील मला भेटले. गांधर्व महाविद्यालयाचा विषय निघाल्यावर मी त्यांना म्हटले मग तुम्हाला डी. जी. मराठे माहीत असतील. ते माझे वडील. ते लगेच म्हणाले काळी टोपी, नेहरू शर्ट, पांढरा शुभ्र लेंगा, पॉलिश केलेल्या चप्पल असा नेहमी पोशाख तेच ना? आणि मग त्यांच्याविषयी भरभरून बोलले. त्यांचे वर्णन करणारे अनेक लोक मला भेटले. त्यात गोरेपान, निळे डोळे, शांत हे वर्णन तर मी अनेकांकडून ऐकले. त्यांना मानणारे पण अनेक जण भेटले की खूप आनंद तर होतोच तसा अभिमानपण वाटतो.

त्या वेळचा काळ फार वेगळा होता, मुलींनी गाणे शिकण्याची प्रथा नव्यानेच उदयाला येत होती. त्या वेळच्या काळात आमच्या आईला म्हणजे सौ. कमलाबाई धुंडीराज मराठे यांना ती. अण्णांनी गाणे शिकवले. ती विशारद झाली. क्लास घेऊ लागली. तिचा आवाज गोड होता. तिला आवडही होती. चांगली समज होती. पेटीवर हात चांगला होता. ती स्वत: धीट होती. त्यामुळेची तिची प्रगती झाली. आम्ही वाड्यात राहत होतो. दुपारच्या वेळी बायका एकत्र बसून गप्पा मारत. नंतर असे झाले की आमच्या आईला वेळ नसे. ती जायची नाही. तेव्हा ती एकदा मला सहज म्हणाली दुपारचा वेळ नुसता गप्पा मारण्यात वाया जायचा त्यापेक्षा आता आपले काम बरे आणि आपण बरे! संगीत शिकवण्याचे हे काम फार आनंददायी आहे.

आमच्या घरात आई-वडील-आजी ह्यांच्या-सारखाच आम्हाला आमच्या काकांचा म्हणजे श्री. अनंतराव गोविंद मराठे यांचापण धाक होता. आमच्या वडिलांपेक्षा ते १९ वर्षांनी लहान होते. त्यामुळे आमच्या सर्व भावंडांचे ते हट्टही पुरवत असत. ते पण संगीत अलंकार होते. तसचे प्रो. बी. आर. देवधर यांच्याकडे त्यांनी व्हॉईस कल्चरचा (आवाज साधना शास्त्र) अभ्यास केला होता. आवाज साधनासाठी अनेक लोक त्यांच्याकडे येत, शिकत, पण त्याचे त्यांनी कधी कोणाकडून पैसे घेतले नाहीत. अनेक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. १२ वर्षे त्यांनीपण गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्यपद सांभाळले.

विद्यालयात दोघा भावांची राम-लक्ष्मणाची जोडी म्हणून प्रसिद्ध होती. अशा ह्या तिघांनी (आई-वडील-काका) अखंड संगीताची सेवा केली. आता पुढील पिढीही तो ठेवा सांभाळत आहे, वाढवत आहे.

ज्या आपल्या वडिलांनी ५४-५५ वर्षे फक्त संगीतासाठी योगदान दिले त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ

'डी. जी. मराठे प्रतिष्ठान' श्री. अण्णासाहेब बेहेरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाले आणि गांधर्व महाविद्यालयात ५० विद्यार्थी तर सरगम संगीत विद्यालयात २५ विद्यार्थी मोफत शिकवण्यात येऊ लागले. हा उपक्रम गेली १० वर्षे चालू आहे. आता माझा धाकटा भाऊ पंडित प्रमोद मराठे हा विद्यालयाचे प्राचार्यपद उत्तमरितीने सांभाळत आहे.

**राधाबाई पटवर्धन**

अनेक कलाकारांचे दानशूरपणाचे तसेच कंजुषपणाचे, गुरूंच्या लहरीपणाचे, रियाजाचे, शिकवण्याच्या पद्धतीचे असे अनेक प्रकारांचे किस्से आपण वाचतो, ऐकतो पण त्यांच्या कुटुंबाविषयी आपल्याला फारशी माहिती नसते. आज मात्र आपण वाचणार आहोत एक जागतिक कीर्तीचे कलाकार पद्मभूषण पं. विनायकराव पटवर्धन यांच्या पत्नी कै. राधाबाई पटवर्धन यांचेविषयी. सर्वजण त्यांना अक्का म्हणत.

पहिली गोष्ट म्हणजे कशा होत्या अक्का? तर अतिशय साधी राहणी, छक्के पंजे माहीत नसलेला मनमोकळा स्वभाव, उदार आणि मनकवड्या. पंडितजींच्या शिष्यवर्गात एक आदरणीय 'आईसाहेब'! (वहिनीसाहेब)

श्री. विष्णुपंत घाग आणि श्री. जनार्दनपंत मराठे यांना पं. विनायकराव शिकवत होते. पण त्यांच्या मनासारख्या ताना काही हे विद्यार्थी म्हणत नव्हते. तेव्हा पंडितजी म्हणाले, ''मी बाहेर जाऊन येतो. तोपर्यंत ह्याच ताना घोटा.'' झाले, गुरू तर बाहेर गेले. हे दोघे ताना घोटत बसले होते. मग अक्कांच्या लक्षात आलं अरे, मुलांनी काही खाल्ले नाही तर ताना कशा येतील. त्यांनी दोघांना आत बोलावून प्रथम काही खायला लावले. मग म्हणाल्या आता चालू देत तुमच्या ताना. त्या दोघांनी मग मनापासून आनंदाने केलेला रियाज पंडितजींना आल्यावर पसंतीस आला. त्याच्या मागची मेख काय हे श्री. जनार्दनपंत खूप रंगवून, भारावून गेल्याप्रमाणे आदराने अक्कांचे वर्णन करून हा किस्सा आम्हाला सांगत.

एक दिवस सकाळी ९.३०-१०ची वेळ, त्यांच्या घरी नेहमी तबल्याच्या साथीला येणारे गृहस्थ आले. हातात रिकाम्या पिशव्या आणि म्हणाले, ''अक्का, बुवा आहेत का?'' पंडितजी तर बाहेर गेलेले, पण अक्कांनी ओळखले की त्यांचे काय काम असेल. ते खरं तर निघाले होते पण अक्का म्हणाल्या, ''थांबा, रेशन आणायला चाललात का? त्या पिशव्या इकडे द्या.'' त्यांनी घरातील गहू, तांदूळ, साखर असे जिन्नस त्या पिशव्यात भरले आणि त्यांना दिले. धन्य ती माऊली! एवढंच इथे म्हणू.

भोपळ्याचे घारगे, दुधीहलवा, रव्याचा गोड शिरा ही अक्कांची खासियत होती. रोज सकाळी उठल्याबरोबर अनेक रागांच्या चिजा त्या म्हणत. शेवटी भैरवी म्हणून उठून कामाला सुरुवात. मंडईत जाऊन भरपूर भाजी आणणे हा त्यांचा आवडता कार्यक्रम.

पूर्वी ज्या स्त्रिया गाणं शिकायला येत त्यांचेबरोबर सोबत म्हणून अक्का बसत. तिथे ऐकून ऐकून अनेक राग त्यांना माहीत झाले होते. कोणीही त्यांचे घरी गेले की त्या गाणे म्हटल्याशिवाय सोडत नसत. मग ते शिकवणारा विद्यार्थी असो किंवा मोठा कलाकार असो, अक्का सर्वांचे गाणे तितक्याच तन्मयतेने ऐकत.

एकदा असे घडले, काही कामानिमित्त पं. विनायकबुवांकडे साक्षात बालगंधर्व आले. त्यांच्या कामाचे बोलणे झाले. ती. अक्कांनी खास साजूक तुपातला शिरा आणला. बालगंधर्वांनी पण तो आवडीने, प्रेमाने खाल्ला. दूध घेतले. देवा, निघतो म्हणाले. ती. अक्कांनी सांगितले गाणे म्हटल्याशिवाय जायचे नाही. अर्थात अक्कांचा आग्रह त्यांना मोडता आला नाही.

कोणीही येवो गाणे म्हटल्याशिवाय जायचे नाही हा अक्कांचा अलिखित नियमच! पं. डी. व्ही. पलुस्कर, इंदिराबाई खाडीलकर, बसवराज राजगुरू, कमलाकर जोशी हे कलाकार पण अक्कांच्या गाणं ऐकवायच्या अलिखित नियमातून सुटले नव्हते.

आता सांगते ह्या अक्का म्हणजे आमच्या सख्या आत्याबाई. आमचे वडील श्री. डी. जी. मराठे यांच्या मोठ्या भगिनी. त्यामुळे काही कामासाठी त्यांच्या घरी गेल्यावर पहिली चौकशी, काय प्रभावती नवीन काय शिकलीस? ते म्हणून दाखव. म्हण म्हटल्याबरोबर गाणं म्हणणारी अक्कांची भाची अशीच माझी त्यामुळे ओळख होती. (इतिहासजमा)

नाटक, सिनेमाला जाणे हा त्यांचा शौक होता. त्यासाठी त्या त्यांच्या बहिणीच्या मुलीला म्हणजे माझ्या आतेबहिणीला आणि कधीतरी मला बरोबर नेत. एकदा तर माझी आतेबहीण मालूताई आणि अक्का यांचेबरोबर स्वत: पंडितजी सुजाता पिक्चर पाहायला गेले होते. पंडितजींच्या कामापुढे त्यांना कधी वेळच मिळत नसे.

तर अशा आमच्या आत्याबाईंचे किस्से वाचल्यावर त्यांचे केलेले स्वभाव वर्णन आपल्याला भावले असेल. शेवटी मराठ्यांची माहेरवाशीण आहे.

**संगीत परंपरा पुढे नेणारी मराठ्यांची पुढची पिढी.**

गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्यपद समर्थपणे सांभाळणारे पं. प्रमोद धुंडीराज मराठे म्हणजे प्रो. डी. जी. मराठे यांचे सगळ्यात धाकटे चिरंजीव. लहानपणी वडिलांकडेच गाण्याची तालीम घेता घेता अचानक हार्मोनियमच्या प्रेमात पडले आणि रियाज करू लागले. हार्मोनियमला संवादिनी हे नाव देणारे पं. मनोहरपंत चिमोटे हे प्रमोदजींचे गुरू. त्यांच्याकडे जायला सुरुवात झाल्यावर थोड्याच दिवसात प्रमोदजींचा संवादिनीशी संवाद सुरू झाला. ८-८ तासाच्या रियाजाने त्यावर प्रभुत्व प्राप्त झाले. आणि प्रगतीची घोडदौड सुरू झाली. त्यानंतर त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. अनेक मोठ्या कलाकारांबरोबर केलेली उत्तम साथसंगत ह्यामुळे पुण्यातील प्रसिद्ध हार्मोनियम वादक अशी ओळख प्राप्त झाली. परदेश दौरे, तेथील कार्यक्रम यामुळे खूप नाव मिळाले. आणि विद्यालयाच्या कामात तन, मन धनाने स्वत:ला झोकून दिल्यामुळे गांधर्व महाविद्यालयाने पण चांगले दिवस पाहिले. पुढे विद्यालयाची पण नवीन वास्तू झाली आणि सर्वच दृष्टीने पुण्यातील नंबर एकचे विद्यालय झाले. आता तिथे अनेक उपक्रम राबवले जातात. आज प्रमोद मराठ्यांचे अनेक शिष्य नावारुपाला आले आहेत. स्वत: प्रमोदजी उत्तम सोलो वादन करतात, उत्तम साथ-संगत करतात आणि उत्तम विद्यार्जन! ह्याच बरोबर अतिशय आनंदी वृत्तीने सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा त्यांचा गुण विशेष आहे. तसेच विद्यालयाच्या कामकाजात मनापासून साथ देणारी त्यांची सहचारिणी म्हणजे सौ. परिणीता प्रमोद मराठे. ही ज्ञानप्रबोधिनीमधील हुशार, शिस्तप्रिय, नवीनतेचा सतत मागोवा घेणारी अशी असल्यामुळे विद्यालयाला त्या गोष्टींचा खूप उपयोग होतो

आहे तसेच हार्मोनियम विशारद असलेली सौ. परिणीता आता एम.ए पण झाली. डान्सचा पण तिचा अभ्यास चालू आहे. तर त्यांचा मुलगा प्रणित मराठे हा पण अतिशय हुशार आहे. हार्मोनियममधील त्याची प्रगती उत्तम आहे. इथे त्याच्याबाबतीत असे म्हणावेसे वाटते की बापसे बेटा सवाई आहे.

सौ. वर्षा नंदलाल गोडबोले म्हणजे पूर्वाश्रमीची कु. प्रभावती धुंडीराज मराठे प्रो. डी. जी. मराठे यांची मोठी मुलगी. गेली २७-२८ वर्षे स्वत:चे सरगम संगीत विद्यालय चालवत आहेत. ५००विद्यार्थी संख्या असलेले हे कोथरूडमधील नावाजलेले विद्यालय आहे. तिथे शास्त्रीय व सुगम संगीत, तबला, हार्मोनियम, सिंथेसायझर, सतार यांचे शास्त्रोक्त शिक्षण दिले जाते. गांधर्व महाविद्यालय पुणे येथे विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवले जाते. २५वर्षांपूर्वीच सरगम संगीतला गांधर्व महाविद्यालयाकडून केंद्र म्हणून मान्यता मिळाली. आज सरगममध्ये १५-१८ वर्षे शिक्षण घेतलेले विद्यार्थीच आता इथे विद्यादानाचे काम करत आहेत. असे २५ शिक्षक म्हणजे एक आनंद-यात्रींचा कुटुंब मेळावाच आहे. असे विद्यादानाचे आदरणीय काम करण्यात धन्यता मानतात. अर्थात त्यांच्या ह्या मनापासून केलेल्या कामामुळेच सरगमची प्रगती झाली आहे असे सौ. वर्षा गोडबोले मानतात. त्याचबरोबर घरातील सर्वांची उत्तम साथ आणि उत्तम योगदान यामध्येच प्रगतीचे रहस्य दडलेले आहे. सौ. वर्षाताईंची मोठी मुलगी सौ. गौरी दीपक शिकारपूर गेले २५ वर्षे सरगममध्ये शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, हार्मोनियम, सिंथेसायझरचे वर्ग घेते. यजमान श्री. नंदलाल र. गोडबोले सुगमसंगीत तर शिकवतातच पण ऑफिस वर्क, स्नेहसंमेलन इत्यादी गोष्टींचे शिस्तबद्ध नियोजन करतात. तर त्यांचा मुलगा श्री. विश्वजीत गोडबोले हासुद्धा स्वत:च्या कारखान्याचा व्याप सांभाळून सरगममध्ये लक्ष घालताय. नवीन योजना, पुरस्कार, माईक सिस्टीम, मासिक सभा इत्यादींचे आयोजन करून हार्मोनियमचा भरपूर रियाज करतो. नंबर दोनची मुलगी सौ. राजश्री सतीश लेले ही सिंगापूरमध्ये राहात असली तरी संगीत शिकते. महाराष्ट्र मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये पुढाकार घेते. आणि तेथूनही सरगमसाठी काही करण्याच तिचा मानस आहे. उत्तम निवेदन करत असल्यामुळे सरगमच्या वार्षिक कार्यक्रमात सहभाग घेते. सौ. वर्षाताईंचा एक भाऊ श्री. गणेश धुंडीराज मराठे यांची मुलगी कु. मधुरा गणेश मराठे हीने बीकॉम नंतर संगीतात एम.ए. केले. गांधर्व महाविद्यालयाची ती विशारद असून सरगममध्ये शिकवते. सगळ्यांनी विद्या हा शब्द उलटा केल्यावर द्यावी हा अर्थ ओळखला आहे. त्याप्रमाणे सर्वांचे काम चालू आहे. तर अशी ही संगीताची परंपरा पुढे नेणारी मराठ्यांची पुढची पिढी!

**- सौ. वर्षा नंदलाल गोडबोले,** (पृ.१२८)

## माझी यशोगाथा : सौ. वर्षाताई नंदलाल गोडबोले

मी पूर्वाश्रमीची प्रभावती धुंडीराज मराठे लहानपणापासून समोरच विद्यालय असल्यामुळे विद्यालयात संध्याकाळी गाणं शिकायची. त्या काळात पेटी, तबला यावर थोडासा तरी परिचय असणे आवश्यक होते त्यामुळे पेटी तबला यांचे प्राथमिक ज्ञान तिथेच मिळाले. वडील संचालक, गांधर्व महाविद्यालयात असल्यामुळे त्यांची थो मुलभडीशी बॅकग्राऊंड असल्यामुळे या गोष्टी शिकता आल्या. आमचे काका श्री. अनंतराव मराठे यांच्याकडे गाणं शिकले. शाळा सेवासदन त्यामुळे घर आणि शाळा यातच रममाण. शाळेतसुद्धा प्रार्थना असो की एखादा कार्यक्रम, स्पर्धा असो त्यात भाग घ्यायची. बघता बघता ११वी झाले आणि त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे कॉलेजच्या फंदान न पडता आमच्या घराजवळच असलेल्या डेक्क एज्युकेशन सोसायटीत प्रवेश घेतला. आम्हाला त्यावेळेला धुपकर, भोपटकर, रिसबूड हे शिकवायला होते. त्याचबरोबर नोकरीही चालू होती. रेस्कॉन कंपनीत नोकरी केली त्याचवेळेला वयाच्या अठराव्या वर्षी स्थळे यायला लागली. गोडबोले यांचे मित्र श्री. खळदकर यांच्या मातोश्रींनी हे स्थळ सुचविले, लग्न ठरले, झाले आणि प्रभावतीची सौ. वर्षा झाले. सुरुवातीचा काळ लग्नानंतर मुलाबाळात गेला. त्यांचे संगोपन, शिक्षण, संस्कार देण्यात व्यतित केले. ह्यांची स्वस्तिक रबरमधील प्रगती चालूच होती. त्यानंतर कंपनीची प्रगती थोडी कुंठीत झाली त्यामुळे कामगार, संप, मोर्चे यामुळे सर्व वातावरण ढवळून निघाले. आम्ही त्यावेळेला स्वस्तिकच्याच एका बंगल्यात वास्तव्याला होतो. माझ्या सासूबाई यांचे मत एखादा प्लॉट घेऊन त्यावर जमेल तशा दोन खोला बांधल्या. त्याचवेळी श्री. यवतकर ह्यांच्या मेव्हण्याची जागा होती. प्लॉट झाला. लगेच बांधकामाला सुरुवात झाली आणि ८०साली आम्ही मुलांसकट खडकी सोडून कोथरूडवासी झालो. मुले मोठी झाली होती. आवश्यकताही होती. त्यामुळे ३ जानेवारी १९८३ मध्ये गाणे शिकवायला सुरुवात केली. सुरुवातीला तीनच मुली होत्या. हळूहळू विद्यार्थी संख्या वाढायला लागली गाण्याबरोबरच तबला, पेटी यांचे वगे सुरू झाले. त्यात आपल्याला स्वत:ला जी गोष्ट चांगली समजली तीच गोष्ट शिकवायची या विचाराने पेटीचा क्लास सुरू केला. थोड्या वर्षांनी तबल्याचे शिक्षण सुरू केले. आज मी तबला विशारद आहे. त्याचबरोबर घरच्यांचे अकृत्रिम प्रेमही मला लाभले. परीक्षेचे फॉर्म्स भरताना विद्यालयाला नाव असावे म्हणून संस्थेला सरगम संगती विद्यालय असे नाव दिले. विद्यालय जसे वाढायला लागले, तसे इरत शिक्षकांची गरज भासू लागली. माझी मोठी मुलगी, जी शिकारपूरांकडे दिली आहे ती गौरी हळूहळू लक्ष घालायला लागली. काही वर्षानंतर श्री. गोडबोलेही या कामाकडे बघायला लागले. विद्यालयाचा व्याप आणखीन वाढला तसे इतर शिक्षकही घेतले आणि आज पुण्यातील सर्वांत मोठी संस्था माझा नावलौकिक मिळविला. एक दर्जेदार संस्था अशी ओळख झाली. सध्या शास्त्रीय गायन, सुगम संगीत, तबला, हार्मोनियम, सतार आणि सिंथेसायजर यांचे शिक्षण दिले जाते. वार्षिक कार्यक्रम हा अतिशय भव्य प्रमाणात साजरा केला जातो. यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. शिकणाऱ्या सर्वांना स्टेजवर सादर करून त्यांच्यात आत्मविश्वास वाढविला जातो मुलगा उद्योजक म्हणून पुढे येतोय. एक (नंबर २)ची मुलगी राजश्री सिंगापूरला असते असा परिवार आहे.

### नांदा सौख्यभरे

तिस्क, उसगाव, फोंडा (गोवा) येथील आपले कुलबांधव श्री. गोविंद ना. मराठे यांचा सुपुत्र चि. अमित याचा शुभविवाह चि. सौ. कां. विभा वियजकुमार कुलकर्णी, ढवळी, फोंडा हीजबरोबर माघ वद्य तृतीया रविवार दिनांक २० फेब्रुवारी २०११ ला शुभमुहूर्तावर श्री महाळसा सभागृहात संपन्न झाला.

वधूवरांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभाशीर्वाद आणि हार्दिक शुभेच्छा!

### मानसन्मान

वेंगुर्ले येथील श्रीधर केशव मराठे (पृ.३९६) यांच्या 'किरात' दिवाळी अंकाचा सन्मान कल्याण येथील अक्षरगंध राज्यस्तरिय दिवाळी अंक स्पर्धेत झाला आहे. २०१०चा सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून किरातची निवड झाली आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा 'किरात'चे संपादक, प्रकाशक श्री. श्रीधर केशव मराठे ह्यांचे हार्दिक अभिनंदन!

### नांदा सौख्यभरे

अलिबाग येथील आपले कुलबांधव श्री. विनायक वसतं मराठे यांचा सुपुत्र चि.शैलेश याचा शुभविवाह चि. सौ. कां. गीता गोपाल दत्तात्रेय बेहरे, बीए (इतिहास), पनवेल हीजबरोबर दिनांक ८ जून २०१०ला सकाळी ९ वाजून ३२ मिनिटांनी गोखले हॉल, पनवेल येथे संपन्न झाला.

वधूवरांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभाशीर्वाद आणि हार्दिक शुभेच्छा!

### अभिनंदन!

पुणे शाखेचे कार्यकारिणी सदस्य श्री. श्रीनिवास मराठे (पृ. ३८९) यांचे चिरंजीव श्री. अनिरूद्ध श्रीनिवास मराठे व सून सौ. गायत्री अनिरूद्ध मराठे या दाम्पत्यास २९ डिसेंबर, २०१० रोजी अमेरिकेत न्यू पोर्ट बीच कॅलिफोर्निया येथे कन्यारत्न झाले. मुलीचे नाव इशिता असे ठेवले आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. अनिरूद्ध आणि सौ. गायत्री यांचे हार्दिक अभिनंदन! तसेच चि. इशिताला आशीर्वाद!

*With best compliments from:*

M : 9823892400
9226575330

Off. : 2362140/6935402

N.P.Marathe
Proprietor
M-9422062472

**KOTESHWAR MOSAIC TILES**
**KOTESHWAR ENGG. WORKS**

**Mfg. & Suppliers of Mosaic Tiles, Ceramic Tiles, All types of Natural Stones & Ferrocement products etc.**

Factory & Office
Plot Number 1&2, Bicholim Ind. Estate, Bicholim-Goa 403 529

# आमच्या २०११ च्या सहली




## अंबाजोगाई

सोबत परळी वैजनाथ

सहल खर्च रू १८००/-

प्रत्येक सोमवार ते रविवार रोज

माहुरगडसहीत

सहलखर्च रू. ३२००




क्रांतिवीरांचे बलिदान
पहायलाच हवे


## अंदमान

हॅवलॉक पाँडेचेरी

रू. १६००० फक्त

६ रात्र ७दिवस विमान भाडे अधिक

मुंबई ते पोर्टब्लेअर व परत विमान प्रवास



## Shilong

चेरापुंजी काझीरंगा

६ रात्र ७ दिवसाची सहल

सहल खर्च Rs:18,500/-

विमान भाडे अधिक



कुलस्वामी दर्शन

## व्याडेश्वर

हेदवी वेळणेश्वर

रू. ४५०० (२ व्यक्तींकरिता)

रू. ३५०० (४ व्यक्तींकरिता)

सर्व खर्च समाविष्ट

घरापासून घरापर्यंत

AC कार प्रवास




## कारवार

पासून (अंकोला -गोकर्ण -कुमठा -होनावर -सिरसी बनवासी -मागोड - याना - इडगुंजी -मुरडेश्वर - शिराळी -कोल्लूर-हत्तंगडी अन्नेगुडे -उडिपी-मलपे-कापू - श्रृंगेरी -होरनाडू -कटील- धर्मस्थल -तलकावेरी बागमांडला-निसर्गधामा -दुबारे -मडिकेरी -नागरहोळे)

## कुर्ग

पर्यंत ९ दिवसात २७ ठिकाणे

९ रात्र १० दिवसाची सहल

रुपये:१८,०००/-फक्त

रेल्वे/विमान प्रवास भाडे अधिक



## चिखलदरा मेळघाट

अमरावती

प्रत्येक गुरुवार ते रविवार

३ रात्र ४ दिवसाची सहल

मुंबई ते अमरावती रेल्वे प्रवास

सहलखर्चःरु-६५०० फक्त

रेल्वे प्रवास भाडे अधिक

www.tourways.in

**Tourways**

C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

संपर्क
राजेश रानडे

092232 73496
022 - 65 281 281

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

**निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्**
बिल्डर अँड डेव्हलपर्स

### आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.


पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org